दैनिक

# लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर


## डिझेलमध्ये १५ टक्के आयसोब्युटेनॉल ब्लेंडिंगची तयारी सुरु झाली; नितीन गडकरींची घोषणा

नवी दिल्ली दि.४ (वृत्तसंस्था)- पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल यशस्वीरित्या मिसळल्यानंतर आता केंद्र सरकारने आपला मोर्चा डिझेल गाड्यांकडे वळवला आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी भारताच्या बायोफ्युअल ट्रान्झिशनच्या पुढच्या टप्प्याची अधिकृत घोषणा केली आहे. भारताचे परकीय चलन वाचवण्यासाठी आणि इंधनावरील स्वावलंबन वाढवण्यासाठी आता डिझेलमध्ये १५ टक्क्यांपर्यंत आइसोब्यूटेनॉल मिसळण्याची योजना सरकारने आखली आहे. सर्वसामान्यांच्या मनात प्रश्न पडू शकतो की पेट्रोलप्रमाणे डिझेलमध्ये थेट इथेनॉल का वापरले जात नाही? नितीन गडकरी यांनी स्वतः याचे कारण स्पष्ट केले आहे. ''इथेनॉल थेट डिझेलमध्ये रासायनिकदृष्ट्या मिसळता येत नाही. म्हणूनच आम्ही इथेनॉलवर प्रक्रिया करून त्यापासून आइसोब्यूटेनॉल तयार करत आहोत. हे आइसोब्यूटेनॉल डिझेलसाठी एक सर्वोत्तम आणि सक्षम पर्याय ठरू शकते.'' इतर बायोफ्युएल्सच्या तुलनेत याची ऊर्जा निर्मिती क्षमता जास्त आहे. हे इंधनाचे इंजिनसोबतचे ट्युनिंग उत्तम राखते, ज्यामुळे वाहनांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होत नाही. पारंपरिक इंधनापेक्षा हे अत्यंत कमी कार्बन उत्सर्जन करते. तंत्रज्ञानातील प्रगतीचा दाखला देत गडकरींनी सांगितले की, १००% इथेनॉल आणि आइसोब्यूटेनॉलवर दोन जनरेटर सेट यशस्वीरित्या चालवून दाखवले आहेत. यामुळे भविष्यात या इंधनावर चालणारी इंजिने सहज बनवता येतील, हे सिद्ध झाले आहे.


(वर्ष ६५ वे अंक १७२) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार, दि.०५ जुलै २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


# देशभरात पावसाचे धुमशान!; गुजरातेत पूरसदृश परिस्थिती

## उज्जैनमध्ये युवक वाहून गेला; केरळममध्ये मुसळधार पाऊस, पंबला धरणाचे दरवाजे उघडले



भोपाळ/जयपूर/लखनऊ/पाटणा दि.४ (प्रतिनिधी)- देशातील जवळपास सर्वच राज्यांमध्ये मान्सूनचे आगमन झाले आहे. राजस्थान आणि गुजरातच्या काही भागांत मान्सूनचे आगमन होणे अजून बाकी असले, तरी गुजरातमध्ये मुसळधार पावसामुळे आधीच पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. गुजरातच्या मेंदारडा भागातील समधियाला गावाजवळ चार वाहने पुराच्या पाण्यात अडकली होती; त्यांमधून १९ जणांची सुटका करण्यात आली.

राजस्थानमधील जयपूर येथे मुसळधार पावसामुळे सवाई मान सिंग रुग्णालयातील मायनर ऑपरेशन थिएटरमध्ये पाणी साचले. परिणामी रुग्णांना दुसऱ्या ठिकाणी हलवावे लागले.

शुक्रवारी मध्य प्रदेशातील भोपाळ आणि इंदूरसह २६ हून अधिक जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाऊस झाला. उज्जैनमध्ये, एका लहान पुलावरून जाण्याचा प्रयत्न करत असताना एक तरुण आपल्या मोटारसायकलसह वाहून गेला.

उत्तर प्रदेशातील २० जिल्ह्यांमध्ये पावसाची नोंद झाली. मथुरेमध्ये मुसळधार पावसामुळे रेल्वे अंडरपासमधील पाण्याची पातळी गळ्यापर्यंत वाढली. कानपूरमधील जीएसव्हीएम मेडिकल कॉलेज परिसरात पाणी साचल्याने तेथील कार आणि दुचाकी अंशतः पाण्याखाली गेल्या. झाशीमध्ये वीज पडून एका शेतकऱ्याचा मृत्यू झाला.

शनिवारी बिहारच्या समस्तीपूर जिल्ह्यात पुलाचा एक स्लॅब कोसळल्याने चार कामगार जखमी झाले. जिल्ह्यात गंगा नदीवर या पुलाचे बांधकाम सुरू होते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जखमी कामगारांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

शनिवारी सोसाट्याच्या वाऱ्यासह झालेल्या मुसळधार पावसामुळे केरळमच्या अनेक भागांमध्ये नद्या आणि धरणांमधील पाण्याची पातळी वाढली, सखल भागांमध्ये पूर आला आणि मालमत्तेचे नुकसान झाले. प्रशासनाने राज्यव्यापी सतर्कतेचा इशारा दिला आणि खबरदारीचे उपाय योजले.

अधिकाऱ्यांनी सांगितले की, पंबला धरणाच्या पाणलोट क्षेत्रात (पान ४ वर)

# राज्यभरात सर्वदूर पाऊस; पुढील दोन दिवस मुसळधार पावसाचा अंदाज

## मुंबई-ठाण्यासह कोकणात जलमय स्थिती



मुंबई दि.४ (प्रतिनिधी)- राज्यभरात पावसाचा जोर कमालीचा वाढला असून आज बहुतांश ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस बघायला मिळला. जून महिना पूर्णपणे कोरडा गेल्यानंतर जुलैच्या पहिल्याच आठवड्यात वरुणराजाने धडाकेबाज बॅटिंग सुरू केल्याने बळीराजा सुखावला आहे, मात्र नागरी भागात जनजीवन विस्कळीत झाले आहे. गेल्या २४ तासांपासून पावसाने रौद्ररूप धारण केलं असून राज्यभर पावसाचं जोरदार धुमशान सुरू आहे. मुंबईसह संपूर्ण कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भाला मुसळधार पावसाने झोडपून काढलं आहे. मुंबईत झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक सखल भागांना तलावाचे स्वरूप आले असून जनजीवनही विस्कळीत झाल्याचं दिसून आलं. पुढील दोन दिवस, म्हणजे ६ जुलै पर्यंत राज्यात बहुतांश ठिकाणी मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे गरज असेल तरच नागरिकांना घराबाहेर पडावं अशा सूचना हवामान खात्याने दिल्या आहेत.

सतत कोसळणाऱ्या पावसाच्या सरींमुळे मुंबईतील अनेक सखल भागात पाणी साचलेलं पाहायला मिळतंय. शहरात कुठे रस्ते खचले, तर कुठे झाडे कोसळण्याच्या गंभीर घटना समोर आल्या आहेत. मुंबई, ठाणे, पालघर आणि रायगड जिल्ह्यातील अनेक ठिकाणी जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झालं आहे. तर दुसरीकडे कोल्हापुरातही पंचगंगेच्या पातळीत मोठी वाढ झाल्याने चिंता वाढली आहे.

मुंबईच्या पश्चिम उपनगरात मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे. अंधेरी एमआयडीसी परिसरात रोल्टा जंक्शन जवळ रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी भरलं आहे. तर सीप्झच्या दोन नंबरच्या गेटसमोर पाणी साचल्याने एमआयडीसी ते जोगेश्वरी विक्रोळी लिंक रोडला जाणारी वाहतूक मंदावली आहे. त्यामुळे वाहनचालकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा असं आवाहन प्रशासनाकडून करण्यात आलं आहे.

मुसळधार पावसामुळे डोंबिवली रेल्वे स्टेशन परिसर जलमय झाल्याचं दिसून आलं. स्टेशन परिसरातील अनेक दुकानांमध्ये पाणी शिरल्याने व्यापाऱ्यांचं मोठं नुकसान झालं आहे. पाणी साचल्यामुळे नागरिकांना रस्त्यावरून ये-जा करताना मोठी कसरत करावी लागत आहे. पाण्यातून वाट काढताना नागरिकांना अडचणीचा सामना करावा लागत आहे.

ठाण्यातील (पान ४ वर)

# घराबाहेर पडू नका; ६ तारखेपर्यंत सरकारने दिलेले अलर्ट गांभीर्याने घ्या

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे नागरिकांना महत्त्वाचे आवाहन

मुंबई दि.४ (प्रतिनिधी)- मुंबई, ठाणे, पालघर आणि महाराष्ट्रातील इतर काही शहरांमध्ये मुसळधार पाऊस कोसळत आहे. गुरुवारपासून पावसाची तीव्रता अधिक वाढली. शनिवारीही पावसाचा जोर कायम असल्यामुळे राज्य शासनाकडून नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहेत. तसेच मुंबई, ठाणे आणि पालघर जिल्ह्याला हवामान विभागाकडून शनिवारी आणि रविवारी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा 'रेड अलर्ट' देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागरिकांना महत्त्वाचे आवाहन केले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकताच माध्यमांशी संवाद साधला. यावेळी राज्यात मुसळधार पावसाबाबतची माहिती त्यांनी दिली. ते म्हणाले, राज्यासह मुंबई महानगर, ठाणे, रायगड, पालघर आणि पुणे-नाशिक जिल्ह्यांच्या काही भागात मुसळधार पाऊस होत आहे. कालपासून शासनाकडून लोकांना वेगवेगळे अलर्ट देण्यात आलेले आहेत. विशेषतः या भागात ६ तारखेपर्यंत अतिशय मुसळधार पाऊस असेल. वादळही येऊ शकते, अशाप्रकारचे अलर्ट दिलेले आहेत.

मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले, काही भागात सरासरीपेक्षा कितीतरी अधिक पाऊस होईल, अशी शक्यता आहे. राज्य शासनाकडून मुसळधार पाऊस असलेल्या भागांना दर तीन तासांनी एसएमएसद्वारे अलर्ट देत आहोत. नागरिकांनी हे अलर्ट गांभीर्याने घेण्याची गरज आहे. आज अनेक ठिकाणी शाळांना सुट्टी दिली आहे. पावसामुळे होणारे संभाव्य अपघात टाळता यावेत, यासाठी लोकांना प्रवास टाळण्याची विनंती केली आहे.

एनडीआरएफ, एसडीआरएफ आणि आपत्ती व्यवस्थापन कक्ष प्रत्येक गोष्टीवर नजर ठेवून आहे. ज्या ज्या ठिकाणी अडचणी येत आहेत, त्या सोडण्याचा प्रयत्न केला जात आहे. लोकांनी शासनाचे अलर्ट पाहूनच शक्यतो घराबाहेर पडावे, असेही आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर व्हायरल ताप आणि अशक्तपणामुळे उपचार, प्रकृती स्थिर

मुंबई दि.४ (प्रतिनिधी)- राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या तब्येतीबद्दल महत्त्वाची अपडेट समोर आली आहे. एकनाथ शिंदे यांना शुक्रवारी अशक्तपणामुळे रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. आता त्यांची तब्येत स्थिर असून संध्याकाळपर्यंत त्यांना डिस्चार्ज देण्यात येणार असल्याची माहिती आहे. सततची दगदग, धावपळ यामुळे एकनाथ शिंदे यांना अशक्तपणा आला होता आणि त्यांची तब्येत बिघडल्याचं सांगण्यात येत आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना शुक्रवारी रात्री आठ वाजल्यापासून जुपिटर रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. एकनाथ शिंदे यांना ताप आणि अशक्तपणा जाणवत असल्याने ठाण्याच्या जुपिटर रुग्णालयात शुक्रवारी दाखल करण्यात आल्याची माहिती आहे. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असून संध्याकाळी त्यांना डिस्चार्ज दिला जाईल अशी माहिती आहे.

ऑपरेशन टायगर आणि त्यानंतर झालेल्या सचिन अहिर यांच्या पक्षप्रवेशामुळे एकनाथ शिंदे यांची प्रचंड धावपळ झाल्याचं दिसून आलं. त्यानंतर लगेच राज्याचं पावसाळी अधिवेशन सुरू झाल्यामुळे एकनाथ शिंदे यांना विश्रांतीसाठी वेळ मिळाला नसल्याने त्याचा परिणाम त्यांच्या तब्येतीवर झाला. परिणामी, शुक्रवारी रात्री एकनाथ शिंदे यांचा ताप आणि अशक्तपणा वाढला. त्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं.

## २१ व्या शतकातील सर्वात मोठ्या ऊर्जा संकटावर भारतानं मिळवला विजय!; पंतप्रधान मोदींचं प्रतिपादन

जयपूर दि.४ (वृत्तसंस्था)- पश्चिम आशियातील युद्धामुळे संपूर्ण जग मंदीच्या विळख्यात सापडले असताना, भारताने २१ व्या शतकातील सर्वात मोठ्या ऊर्जा संकटाचा यशस्वीपणे सामना केला आहे, असा ठाम विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला आहे. योग्य वेळी घेतलेले धोरणात्मक निर्णय, अचूक नियोजन आणि भारताच्या मजबूत मुत्सद्देगिरीमुळे देश इंधनाच्या मोठ्या धक्क्यातून सुरक्षित राहिला, असं प्रतिपादन त्यांनी केलं.

राजस्थानमधील बहुप्रतीक्षित रिफायनरी प्रकल्पाचं उद्घाटन केल्यानंतर एका जाहीर सभेला संबोधित करताना पंतप्रधान मोदी बोलत होते. यावेळी त्यांनी जोधपूर विमानतळाच्या नवीन टर्मिनल इमारतीचंही लोकार्पण केलं.

जागतिक परिस्थितीवर भाष्य करताना पंतप्रधान मोदी म्हणाले, ''पश्चिम आशियातील संघर्षामुळे जगातील अनेक मोठ्या अर्थव्यवस्था अभूतपूर्व ऊर्जा संकटाचा सामना करत आहेत. मात्र, २१ व्या शतकातील नव्या भारताच्या इच्छाशक्तीनं आणि प्रयत्नांनी या महासंकटावर मात केली आहे.''

भारतानं प्रत्येक पातळीवर वेळेतच योग्य निर्णय घेतले, संकटाचा आधीच अंदाज घेऊन प्रभावी रणनीती आखली आणि आपल्या राष्ट्रीय संसाधनांचा संतुलितपणे वापर केला, ज्यामुळे देशांतर्गत पुरवठ्यावर कोणताही परिणाम झाला नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

याच दरम्यान विरोधकांवर निशाणा साधताना पंतप्रधान म्हणाले, ''संकटाच्या काळात काही शक्ती देशात भीतीचे वातावरण आणि अफवा पसरवण्यात व्यस्त होत्या. मात्र, आमचे सरकार सर्वसामान्यांना अखंड ऊर्जा पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी पडद्यामागे अहोरात्र काम करत होते.''

भारताच्या एलपीजी गरजेपैकी जवळपास ६० टक्के भाग आयातीवर अवलंबून आहे. पश्चिम आशियातील युद्धामुळे 'हॉर्मुजची सामुद्रधुनी' बंद होण्याचा धोका निर्माण झाला होता, ज्यामुळे भारतात इंधनाचा मोठा तुटवडा निर्माण होऊ शकला असता.

ऊर्जा सुरक्षेला देशाच्या स्वाभिमानाशी जोडत पंतप्रधान म्हणाले की, एखादा देश जेव्हा ऊर्जेच्या बाबतीत स्वावलंबी होतो, तेव्हाच त्याचा जागतिक आदर वाढतो. राजस्थानमधील हा रिफायनरी प्रकल्प भारताच्या आत्मनिर्भरतेच्या दिशेने टाकलेले एक ऐतिहासिक पाऊल आहे. ''हा प्रकल्प केवळ दगड रचण्याचा नाही, तर तो पूर्ण करण्याचा भाजप सरकारचा संकल्प दर्शवतो,'' असे सांगत पंतप्रधानांनी विरोधकांना टोला लगावला.

## पुरुषदेखील बळी ठरू शकतात, केतन अग्रवाल हत्या प्रकरणानंतर राष्ट्रीय पुरुष आयोगाची भाजपा खासदाराची मागणी

नवी दिल्ली दि.४ (वृत्तसंस्था)- राज्यसभेचे खासदार आणि लव्हली प्रोफेशनल विद्यापीठाचे संस्थापक अशोक कुमार मित्तल यांनी केतन अग्रवाल हत्या प्रकरणानंतर आपली एक जुनी मागणी पुन्हा लावून धरली आहे. पुण्यातील बांधकाम व्यावसायिक २६ वर्षीय केतन अग्रवालच्या हत्येमुळे देशभरात संतापाची लाट उसळली आहे. २० वर्षीय सिया गोयल आणि तिचा २२ वर्षीय मित्र चेतन चौधरीने मिळून ही हत्या केल्यानंतर आता या प्रकरणाबाबत विविध बाजूंनी चर्चा होत आहेत. त्यातच राज्यसभेचे खासदार अशोक मित्तल यांनी यानिमित्ताने राष्ट्रीय पुरूष आयोगाची पुन्हा एकदा मागणी केली आहे.

खासदार अशोक मित्तल यांनी राज्यसभेत डिसेंबर २०२५ मध्ये केलेल्या एका भाषणाचा व्हिडीओ शनिवारी शेअर केला. ज्यात त्यांनी राष्ट्रीय पुरूष आयोगाची स्थापना करण्याच्या मागणीसाठी खासगी विधेयक मांडले होते. अशोक मित्तल हे पंजाबमधून राज्यसभेवर आम आदमी पक्षाच्या माध्यमातून निवडून गेले होते. नुकतेच त्यांनी राघव चड्ढा यांच्यासह भाजपामध्ये प्रवेश केला.

''केतन अग्रवाल प्रकरण हा एक इशारा आहे की, पुरूषदेखील बळी ठरू शकतात. पुरूषांना यंत्रणेचा पाठिंबा, कायदेशीर संरक्षण आणि त्यांचा आवाज ऐकला जाईल, असे व्यासपीठ मिळायला हवे. लिंगभेद न करता सर्वांसाठी न्याय समान असा पाहिजे'', असे विधान अशोक मित्तल यांनी आपल्या एक्स पोस्टमध्ये केले आहे.

# उद्धव ठाकरेंनी हिंदुत्वाच्या दिशेने पाऊल टाकलं तर स्वागतच, बच्चू कडूंची भूमिका

मुंबई दि.४ (प्रतिनिधी)- शिवसेना (शिंदे गट) नेते बच्चू कडू यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रकृतीबाबत चिंता व्यक्त करत त्यांना काही दिवस विश्रांती घेण्याचा सल्ला दिला. त्याचवेळी उद्धव ठाकरे यांनी रामरक्षा पठण आणि हिंदुत्वाच्या मुद्द्यावर सुरू केलेल्या आंदोलनाचे स्वागत करत, ''उद्धव ठाकरे हिंदुत्वाच्या दिशेने एक पाऊल टाकत असतील तर त्याचे स्वागतच आहे,'' अशी भूमिका त्यांनी मांडली. तसेच शेतकरी कर्जमुक्तीच्या निर्णयात आवश्यक दुरुस्त्या करूनच अंमलबजावणी करावी, अशी अपेक्षाही त्यांनी सरकारकडे व्यक्त केली.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रकृतीबाबत बोलताना बच्चू कडू म्हणाले की, शिंदे हे कार्यकर्त्यांसाठी नेहमी उपलब्ध असतात. पहाटेपर्यंत कार्यकर्त्यांच्या भेटी, लोकांच्या समस्या आणि बैठका अशा सततच्या धावपळीमुळे त्यांनी स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष केले आहे. त्यांच्या मते, शिंदे यांना ताप असतानाही त्यांनी बैठकींना उपस्थिती लावली होती.

चोवीस तास काम करणाऱ्या व्यक्तीने आता काही काळ स्वतःसाठीही वेळ काढला पाहिजे. शरीराला विश्रांती मिळाली नाही तर अडचणी वाढू शकतात. त्यामुळे त्यांनी लवकर बरे होऊन पुन्हा जनसेवेत सक्रिय व्हावे, अशी प्रार्थना असल्याचे कडू यांनी सांगितले.

उद्धव ठाकरे यांनी रामरक्षा पठण आणि हिंदुत्वाशी संबंधित आंदोलनाची घोषणा केल्याबाबत विचारले असता बच्चू कडू यांनी मवाळ भूमिका घेतली. ते म्हणाले की, भाजप आणि शिवसेनेचा जो मूळ विचार आहे, त्या विचारांच्या दिशेने उद्धव ठाकरे एक पाऊल टाकत असतील तर त्याचे स्वागत केले पाहिजे. त्यांनी अशाच प्रकारे पुढेही पावले टाकावीत. त्यामुळे हिंदुत्वाशी संबंधित अनेक प्रश्नांवर अधिक सकारात्मक वातावरण निर्माण होऊ शकते, असे मत त्यांनी व्यक्त केले.

राज्य सरकारने जाहीर केलेल्या शेतकरी कर्जमुक्तीबाबतही बच्चू कडू यांनी प्रतिक्रिया दिली. कर्जमुक्तीची तारीख रविवारी निश्चित करण्यात आल्याचे सांगत त्यांनी आश्चर्य व्यक्त केले. त्यांच्या मते, दोन दिवस उशीर झाला तरी चालेल; मात्र विधान परिषदेत सुचवलेल्या दुरुस्त्यांचा समावेश करूनच अंतिम शासन निर्णय (जीआर) काढला पाहिजे. शेतकऱ्यांच्या हितासाठी आवश्यक बदल केल्यानंतरच कर्जमुक्तीची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

## आमचे ऑपरेशन ३.० सुरु; संजय शिरसाट यांचा दावा

छत्रपती संभाजीनगर दि.४ (प्रतिनिधी)- राज्यातील राजकीय घडामोडी पुन्हा एकदा वेग घेण्याची शक्यता असून सत्ताधारी शिवसेनेचे ऑपरेशन ३.० सुरू झाले आहे. लवकरच एक मोठा महाभूकंप पाहायला मिळेल, असा खळबळजनक दावा मंत्री संजय शिरसाट यांनी आज पत्रकार परिषदेत केला. तसेच, उद्धव ठाकरे यांच्या घंटानाद आंदोलनावर आणि संजय राऊत यांच्या टीकेवरही त्यांनी सडकून टीका केली.

उद्धव ठाकरे गट सोडून जाणाऱ्या कार्यकर्त्यांवर पैसे घेऊन गेल्याचा आरोप संजय राऊत करतात. यावर बोलताना शिरसाट यांनी राऊतांवर निशाणा साधला. ''दरवेळेला कुणी पक्ष सोडून गेला की, संजय राऊत त्याला वेश्या, गद्दार म्हणतात किंवा त्याचा लिलाव झाल्याचा आरोप करतात. या माणसाच्या डोक्यावर परिणाम झालाय की काय? स्वतःचे अपयश लपवण्यासाठी ते असे आरोप करत आहेत. माणसं घरातून फुटतातच का, हे त्यांनी सांभाळायला हवे.''

याच मुद्द्यावर बोलताना शिरसाट यांनी मोठा दावा केला की, ''आमचे ऑपरेशन ३.० सुरू झाले आहे. आम्ही सध्या सॅम्पल चेक करत आहोत. काही दिवसांतच तुम्हाला त्याचे परिणाम पाहायला मिळतील. राज्यात महाभूकंप होणार आहे. हे ऑपरेशन कधी करायचे आणि किती लोकांचे करायचे, याचा आकडा आणि निर्णय स्वतः मुख्यमंत्री एकनाथ शिंदे ठरवतील.''

## पक्षाच्या विलीनीकरणाचा कुठलाही विचार नाही, शशिकांत शिंदे यांची स्पष्टोक्ती

मुंबई दि.४ (प्रतिनिधी)- राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी पक्षाच्या विलीनीकरणाच्या चर्चांना पूर्णविराम देत, ''कॉंग्रेसमध्ये जाण्याचा किंवा पक्षाचे विलीनीकरण करण्याचा कुठलाही विचार नाही,'' असे स्पष्ट शब्दांत सांगितले. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या राजकीय चर्चांना त्यांनी केवळ अफवा ठरवत, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली अधिक आक्रमकपणे संघटन बांधणीवर लक्ष केंद्रित करत असल्याचे सांगितले.

पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील पक्ष पदाधिकाऱ्यांच्या बैठकीनंतर आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी राज्यातील राजकीय परिस्थिती, विरोधकांची भूमिका, राम मंदिरातील कथित गैरव्यवहार, मुंबईतील पावसाची परिस्थिती, कायदा-सुव्यवस्था आणि विधिमंडळाच्या कामकाजावरही सरकारवर जोरदार टीका केली.

गेल्या काही दिवसांपासून राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षातील काही नेते सत्तेत जाण्याच्या विचारात आहेत किंवा कॉंग्रेसमध्ये विलीन होण्याची चर्चा सुरू असल्याच्या बातम्या समोर येत आहेत. यावर शशिकांत शिंदे यांनी ठाम भूमिका मांडली.

ते म्हणाले की, शरद पवार यांच्या विचारांवर पक्षाची वाटचाल सुरू असून सध्याच्या राजकीय परिस्थितीत सक्षम विरोधी पक्ष म्हणून मोठी संधी राष्ट्रवादी कॉंग्रेसला मिळणार आहे. त्यामुळे पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यावर भर दिला जात असून विलीनीकरणासंदर्भात कोणतीही चर्चा झालेली नाही. सतत अशा प्रकारच्या बातम्या कोण पसरवत आहे? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. विरोधी पक्षांमध्ये संभ्रम निर्माण करण्यासाठी आणि कार्यकर्त्यांचे मनोबल खच्ची करण्यासाठी जाणीवपूर्वक अशा चर्चा रंगवल्या जात असल्याचा आरोप शशिकांत शिंदे यांनी केला. पक्षाच्या संघटनात्मक बांधणीवर भर देत शशिकांत शिंदे म्हणाले की, गेल्या महिनाभरापासून मुंबईसह राज्यभर बैठका सुरू आहेत. येत्या काळात राज्य कार्यकारिणी आणि जिल्हा कार्यकारिणीत काही महत्त्वाचे बदल करण्यात येणार असून १५ ऑगस्टनंतर सुप्रिया सुळे, पक्षाचे खासदार, आमदार आणि वरिष्ठ नेते राज्यव्यापी दौरा करणार आहेत. या दौऱ्याद्वारे प्रत्येक जिल्ह्यात संघटना मजबूत करण्याचे आणि कार्यकर्त्यांपर्यंत थेट पोहोचण्याचे नियोजन असल्याचे त्यांनी सांगितले. राम मंदिरातील कथित देणगी चोरीच्या आरोपांवरून उद्धव ठाकरे यांनी सुरू केलेल्या रामरक्षा आंदोलनालाही शशिकांत शिंदे यांनी पाठिंबा दर्शविला. ते म्हणाले की, रामाचे नाव, मंदिराचे नाव आणि धर्माचा वापर करून सत्ता मिळवायची आणि नंतर त्याच माध्यमातून पैसा कमवायचा, असा नवीन प्रकार सुरू झाला आहे. २०१४ पासून राम मंदिराचा मुद्दा निवडणुकांमध्ये वापरला गेला, मात्र आता देणग्या आणि मंदिर व्यवस्थापनाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत असल्याचे त्यांनी म्हटले.

# आध्यात्मिक वाटचालीतील अहंकार

आध्यात्मिक क्षेत्रातील साधकाच्या मार्गामध्ये 'अहंकार' हा सर्वाधिक दुस्तर असा अडथळा असतो. याविषयीचे सखोल चिंतन प्रत्येक साधकाने करण्याची नितांत आवश्यकता असते. कारण, त्या अहंकाराला बाजूला सारल्याखेरिज अध्यात्म मार्गावरील पुढील वाटचाल ही सर्वार्थाने निर्थकच ठरत असते.

संत श्री ज्ञानेश्वर माऊलींनी म्हणूनच तर 'नवल अहंकाराचे गोठी, विशेष न लगे अज्ञानाचे पाठी, सज्ञानाचे झोंबे कंठी, नाना संकटी नाचवी' अशा अतिशय सुस्पष्ट आणि समर्पक शब्दांच्या माध्यमातून आम्हा सर्वांना सावध केलेले आहे. आपल्या पसायदानाच्या माध्यमातून संत शिरोमणी श्री नामदेव महाराजांनीदेखील; 'अहंकाराचा वारा न लागो राजसा माझिया विष्णुदासा भाविकांसी' असेच मागणे भगवान परमात्म्याकडे मागितलेले आहे. नारदीय कीर्तनात ऐकावयास मिळणारे; 'घातक मद अवलोकी' अथवा 'दूर दे अहंकार फेकून' हे अभंगदेखील नेमके हेच सूचित करतात. म्हणूनच; या अहंकाराबाबत थोडं चिंतन करणे उपयुक्त ठरेल.

शारीरिकदृष्ट्या विचार केल्यास, कफ, वात आणि पित्त यांचे संतुलन बिघडल्यास मानवाला त्याचा त्रास सहन करावा लागतो. साधनामार्गातही हेच अनुभवास येते. सत्त्व, रज आणि तम या तीनही गुणांच्या बाबतीत आपल्याला असाच त्रास सहन करावा लागत असतो. अनेकांना हे विधान वाचून आश्चर्य वाटणे स्वाभाविकच आहे. रज आणि तम या दोन गुणांमुळे अहंकाराची बाधा होणे हे तसे समजण्यासारखे आहे. पण, सत्त्वगुणांमुळेही अहंकार निर्माण होतो, हे आवर्जून लक्षात घेण्याची नितांत गरज आहे.

पूजनीय विनोबा भावे यांच्या मते, सत्त्वगुणाचा अभिमान जडणे यालाच खरं तर अहंकार असे म्हणतात. सत्त्वगुणामुळे निर्माण होणारा हाच अहंकार आत्म्याला आपल्या मूळ आणि शुद्ध स्वरूपापासून दूर नेत असतो; असे विनोबाजी सांगत असत. यासाठी विनोबाजी कंदिलाचा दृष्टांत देत असत. कंदील प्रकाश देऊ लागल्यानंतर काही काळाने त्याच्या काचेवर काजळी जमा होत असते. कंदिलातून प्रकाश व्यवस्थितपणे बाहेर येण्यासाठी काही काळाने त्या कंदिलाच्या काचेवर जमा होणारी काजळी पुसावी लागते. ही काजळी आपल्यातील तमोगुणाचे प्रतीक असल्याचे ते सांगत असत. मात्र, केवळ एवढेच करणे पुरेसे ठरत नसते. कंदिलाच्या काचेवर काही काळानंतर धूळही जमा होत असते. त्यामुळेदेखील प्रकाश व्यवस्थितपणे बाहेर पडू शकत नसतो. त्यामुळे ठरावीक कालावधीनंतर कंदिलाच्या काचेवर जमा होणारी धूळही पुसून टाकावी लागते. ही धूळ आपल्यातील रजोगुणाचे प्रतीक आहे. काजळी आणि धूळ निघून गेल्यावर कंदिलातून अधिक तेजस्वीपणे प्रकाश मिळू लागतो. मात्र, त्यामुळे डोळे दीपून जातात. ते टाळण्यासाठी डोळ्यांसमोर कागदाचा एखादा तुकडा धरणे सोयीचे ठरते. म्हणजेच सत्त्वगुणाचा हा एक दोष आहे. सत्त्वगुणाचा अहंकार होऊ नये; याकरिता त्याबाबतचा अभिमान आणि आसक्ती टाळणे हाच एकमेव उपाय आहे.

सत्त्वगुणाचा होणारा घातक अहंकार टाळण्यासाठी दोन उपाय आहेत. यापैकी पहिला उपाय म्हणजे, या सत्त्वगुणाला आपल्या ठायी स्थिर करावे. सत्त्व गुण हा आपल्या व्यक्तिमत्त्वाचा आणि नित्य वर्तनाचा अविभाज्य भाग ठरल्यास, त्याचा अभिमान होत नाही. यासंबंधीही विनोबाजींनी उदाहरण दिलेले आहे. आजारपणात झोप नीट लागत नाही. त्यावेळी कधीतरी एकदा नीट झोप लागली की, आपल्याला आज छान झोप लागली, असे आपण सर्वांना सांगतो. मात्र, जेव्हा आजारपण नसते तेव्हा त्याबाबत आपल्याला वेगळे असे काहीच वाटत नसते. सत्त्वगुण क्वचितच प्रकट होत असेल, तर त्याचा अभिमान वाटतो. सत्त्वगुणामुळे निर्माण होणारा अहंकार टाळण्यासाठी त्याबाबतची आसक्ती संपविणे, हा दुसरा प्रभावी उपाय आहे. अहंकार प्रयत्नपूर्वक घालविला; तरीदेखील त्याबाबतची आसक्ती मात्र शिल्लक राहू शकते. यासाठीचा भगवान गोपालकृष्णांनीच सांगितलेला मार्ग महत्त्वाचा आहे. 'यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत यत्तपस्यसि कौन्तेय तत्कुरुष्व मदर्पणम' (भ. गीता - अ. ९/ श्लोक २७) या उपदेशानुसार; आपण केलेले प्रत्येक कर्म भगवंतालाच समर्पित केले, तर सत्त्वगुणाचा अहंकार निर्माण होणारच नाही. समर्थ रामदास स्वामींनी या अहंकाराच्या; अहंभाव, अहंकार आणि अहंता अशा तीन छटा उलगडून दाखवल्या आहेत. आपल्यातील 'मी' पणाचे सातत्याने प्रदर्शन करीत राहणे, हा 'अहंभाव'; आपल्या सात्त्विक कार्याचा अभिमान बाळगणे हा 'अहंकार' आणि प्राप्त झालेल्या विद्वत्तेमुळे आपण खूप ज्ञानी आहोत, असा भाव जागृत होणे ही 'अहंता' असे समर्थांनी म्हटले आहे. ही अहंता नष्ट झाल्याखेरिज मोक्षप्राप्ती होणे शक्य नाही, असेही समर्थांनी सांगितले आहे.

'मनाच्या श्लोकांमध्ये समर्थ म्हणतात; स्वरूपी उदेला अहंकार राहो, तेणे सर्व आच्छादिले व्योम पाहो' समर्थांनी अहंकाराला दिलेली 'राहू'ची उपमा समर्पक आहे. आकाशाप्रमाणेच शुद्ध आणि निर्मळ असलेल्या मूळ स्वरूपातच 'अहं'रूपी राहूचे वास्तव्य असून त्याने या 'स्वरूपा'चे मूळ रूपच झाकोळून टाकले आहे. त्यामुळेच सर्वत्र तम म्हणजेच अंधार अथवा काळोख निर्माण झालेला आहे. हेच जीवाला झालेले स्वरूपाबाबतचे अज्ञान आहे. याचेच पर्यवसान पुढे तमोगुणात होते. खरं तर राहू हा केवळ कल्पनामात्रच आहे. मात्र, सूर्यग्रहणात त्याने सूर्याला गिळून टाकले असल्याची कल्पना मांडण्यात येते. नेमके तसेच या अहंकाररूपी राहूच्या बाबतीत घडते. अहंभावामुळे जीव बहिर्मुख होऊन तो केवळ आणि केवळ विषयांचेच चिंतन करू लागतो आणि जन्म-मृत्यूच्या जंजाळात अडकतो, असे संतांनी म्हटलेले आहे. समर्थ म्हणतात :- 'सदा विषयो चिंतिता जीव झाला अहंभाव अज्ञान जन्मासि आला विवेकी सदा स्वरूपी भरावे जीवा उगमी जन्म नाही स्वभावें' (मनाचे श्लोक - क्र. १४५) हा अहंकार स्वत:हून जाऊ शकत नाही. म्हणूनच समर्थ सांगतात; 'कळेना कळेना, कळेना ढळेना, ढळे नाढळे संशयोही ढळेना, गळेना गळेना, अहंता गळेना, बळें आकळेना, मिळेना मिळेना' (मनाचे श्लोक - क्र. १४२). अहंकार घालविण्यासाठी कोणत्याही प्रकारच्या बळाचा उपयोग होत नसतो. अहंकारामुळे मानव आपल्या धनाचा तसेच शारीरिक बलाचा उपयोग तो इतरांना त्रास देण्याकरिताच करू लागतो. रावण हे अशा प्रवृत्तीचे एक प्रतीक आहे. हा अहंकार; समाजासाठी संबंधित व्यक्तीची उपयुक्तता संपुष्टात आणतो. कबीरजी म्हणतात; 'उँचा भया तो क्या भया जैसे ताल खजूर, पथिकन को छाया नाहीं फल लागै अति दूर'

म्हणूनच समर्थांनी; 'जेणे भक्षिली मक्षिका जाणिवेची, तया भोजनाची रूची प्राप्त कैसी, अहंभाव ज्या मानसीचा विरेना, तया ज्ञान हे अन्न पोटी जिरेना' अशी जाणीव आम्हाला करून दिली आहे. समर्थ म्हणतात; 'अहंतागुणे सर्वही दु:ख होते, मुखे बोलिले ज्ञान ते व्यर्थ जाते, सुखी राहता सर्वही सुख आहे, अहंता तुझी तूचि शोधूनि पाहे' अहंकाराच्या बाबतीत एक सर्वात मोठी अडचण असते. आपल्या ठायी अहंकार वसलेला आहे का; हे खरं तर आपण स्वत:च शोधणे अत्यावश्यक असते.

तथापि, हा मुद्दा खूपच नाजूक आहे. इतरांचे वागणे अहंकाराचे आहे असे वाटणे, हा देखील अहंकारच ठरतो. आपली केली गेलेली स्तुती, आपल्याला मिळत असलेला आदर, आपल्यापुढे इतरांकडून व्यक्त केली जाणारी नम्रता, हे जर आपल्याला सुखावत असेल आणि त्यामुळे तसे करीत असलेल्या व्यक्तींबाबत आपल्या मनात विशेष आपुलकीची भावना निर्माण होत असेल, तर तो देखील एक प्रकारचा अहंकारच ठरतो. दोष दाखवून देणारा हाच जर आपणाला दोषी वाटत असेल; तर तोही एक प्रकारचा अहंकारच.

# ज्ञान, कर्म, तपस्या आणि सेवेचा अनोखा संगम म्हणजे वैजनाथ काळे

**'बालकामगार** ते बालभारती सदस्य' असा दिव्य शैक्षणिक प्रवास करणारे महाराष्ट्रातील एकमेव केंद्रप्रमुख जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, एकलारा, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड येथील केंद्रप्रमुख वैजनाथ काळे हे प्रदीर्घ अशा तब्बल ३९ वर्षांच्या शासनाच्या शिक्षण सेवेतून दिनांक ३० जून, २०२६ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत.

वैजनाथ काळे यांचा जन्म आंदेगाव तालुका मुखेड येथे झाला. प्राथमिक शिक्षण आंदेगाव आणि वळग येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतून पूर्ण झाले. त्यानंतर जिल्हा परिषद हायस्कूल मुलांचे, देगलूर येथून माध्यमिक शिक्षण शासकीय वस्तीगृहात राहून पूर्ण केले. वस्तीगृहात असतानाच स्वावलंबन, बंधूता, ऐक्य, श्रमप्रतिष्ठा, वाचन यांची आवड निर्माण झाली. विद्यार्थीदशेत असतानाच अनेक पुरस्कार, बक्षिसे, विविध स्पर्धेत प्राविण्य मिळाले. त्यातून पुढे जाण्याची सतत धडपड चालू राहीली. इयत्ता सातवीमध्ये असताना दारूबंदी वर्षानिमित्त निबंध स्पर्धा आयोजित केली होती. त्यावेळी देगलूर तालुक्यातून सर्वप्रथम येण्याचा मान मिळाला. तत्कालीन जिल्हाधिकारी रामानंद तिवारी आणि शिक्षण सभापती लक्ष्मणराव हासेकर यांच्या हस्ते पुरस्कार मिळाला. ही प्रेरणा आयुष्यात पुढे जाण्यासाठी खूप मदत झाली. विद्यार्थी काळात श्री महावाडे सर, श्री कंठे सर, रामलू सुवर्णकार सर आणि विठ्ठलराव दवणे सरांचे प्रेम आणि मार्गदर्शन खूप मिळाले. दवणे सरांच्या (सेवानिवृत्त उपशिक्षणाधिकारी) शिकवणी आणि हातोटीतून इंग्रजी विषयावर प्रभुत्व मिळविता आले. पुढील काळात याचा खूप फायदा शेकडो विद्यार्थ्यांसाठी झाला.

शासकीय अध्यापक विद्यालय नांदेड येथून १९८६-८८ या काळात डी.एड. शिक्षण पूर्ण झाले. माध्यमिक शिक्षण काळात कर्मवीर भाऊराव पाटील यांचे चरित्र वाचण्यात आलेले होते. त्यात काम करता करता शिक्षण घेऊ शकता येते ही प्रेरणा मिळाली. नांदेड येथील श्रीनगर भागात कमलाकरराव कस्तुरे यांची गणेश भोजनालय नावाची खानावळ होती. तेथे अर्धवेळ काम करून डी.एड.चे शिक्षण पूर्ण झाले. आणि त्यावेळी डी.एड.च्या परीक्षेत उच्च प्रविणता आणि सर्वप्रथम येण्याचा मान मिळाला. तत्कालीन जिल्हा माहिती अधिकारी सुधाकर देशपांडे यांनी ही बातमी राज्यातील महत्त्वाच्या वर्तमानपत्रात टाकलेली होती. 'खानावळीत काम करणारा वैजनाथ काळे डी.एड.मध्ये सर्वप्रथम' अशी बातमी सर्वत्र पोहोचली. ही बातमी वाचून छत्रपती शिवाजी हायस्कूल सगरोळी येथील राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त मुख्याध्यापक मनोहरराव सगरोळीकर यांनी नांदेडला आपला सेवक पाठवून वैजनाथ काळे यांना बोलावून घेऊन सगरोळी येथे पूर्ण पगाराची नोकरी दिली होती. छत्रपती शिवाजी हायस्कूल या नामांकित शाळेत विद्यार्थ्यासोबत, शिक्षक आणि वरिष्ठासोबत खूप असे शिकायला मिळाले. त्यानंतर महाराष्ट्र राज्य दुय्यम सेवा निवड मंडळामार्फत मुलाखती मधून जिल्हा परिषद सेवेत रुजू झाले. केंद्र शाळा देवठाणा तालुका भोकर. येथे सहा वर्षे सेवा पूर्ण झाल्यानंतर केंद्रशाळा गोजेगाव तालुका मुखेड येथे बदली झाली. येथे एकूण आठ वर्षाचा काळ गेला. या काळात गोजेगाव केंद्रातील ज्या शाळेवर काही अडचण आली तेथे प्रशासन सतत पाठवत राहिले. या आठ वर्षाच्या काळात प्राथमिक शाळा गोणेगाव, मारजवाडी, आंदेगाव वाडी, सावळी तांडा, गोजेगाव अशा सहा शाळेवर काम करावे लागले. या शिक्षक काळातील अनेक विद्यार्थी विविध पदावर, विविध क्षेत्रात, व्यवसायात स्थिर झालेले आहेत. सुंदर हस्ताक्षर, वाचन, स्पर्धा परीक्षा, वक्तृत्व यामध्ये अनेक विद्यार्थ्यांनी यश मिळिवलेले आहे.

पुणे विद्यापीठातील अरणेश्वर अध्यापक महाविद्यालय येथून सुट्टीतील बी.एड. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर नोव्हेंबर २००३ मध्ये शैक्षणिक अर्हता आणि गुणवत्तेच्या निकषावर पदोन्नतीने केंद्रप्रमुख पदावर बरबडा येथे रुजू झाले. पुढे तेथून देगलूर तालुक्यात आलूर येथे बदली झाली. या काळात नरंगल, चैनपुर, भायेगाव या केंद्राचा अतिरिक्त पदभार यशस्वीपणे सांभाळून आपल्या कामाचा आगळावेगळा ठसा त्यांनी उमटवला. २०१३-२०१७ केंद्र कासराळी आणि केसराळी तालुका बिलोली येथे उत्तम काम करण्याची संधी मिळाली. ज्ञानरचनावाद आणि कृतीवर आधारित शिक्षण यावर शिक्षकासाठी अनेक चर्चासत्रे, कृती सत्रे आयोजन केले. तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी माननीय अभिमन्यू काळे आणि जिल्हा परिषदेचे सदस्य माननीय लक्ष्मणरावजी ठक्करवाड यांनी अनेक उपक्रमशील बाबी पाहून विद्यार्थी शिक्षक आणि श्री काळे सरांचा सन्मान केला. २०१७ मध्ये दीर्घ वास्तव्य या कारणावरून चिखली आणि पुन्हा प्रधान सांगवी तालुका किनवट येथे प्रशासकीय बदली झाली. येथील आठ वर्षाच्या सेवेनंतर केंद्र मावली, एकलारा तालुका मुखेड येथे विनंती बदली झाली.



एकूण तब्बल २३ वर्षे केंद्रप्रमुख पदाची जबाबदारी पूर्ण झाली. शिक्षक, केंद्रप्रमुख पदासोबत अनेक सामाजिक, राष्ट्रीय कामात सहभागी झाले. राष्ट्रीय जनगणना कामात देगलूर तालुका प्रभारी, ग्राम पंचायत निवडणुकीत निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अत्यंत महत्त्वाची जबाबदारी पार पाडली. नुकतेच आधारकार्ड काढण्याची मोहीम राबविण्यात येत होती. त्याचे मास्टर ट्रेनर, प्रसार, प्रसिद्धीप्रमुख म्हणून तहसील कार्यालय देगलूर यांनी दिलेली कार्य जबाबदारी यशस्वीपणे पूर्ण केली.

'शिक्षक प्रशिक्षण' हा आवडता विषय. केंद्र स्तरापासून राज्यस्तरावरील सर्व प्रशिक्षण कामात सक्रिय सहभाग घेऊन उत्कृष्ट सुलभक, तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून काम केले. स्मार्ट पिटी, इयत्ता पहिलीपासून इंग्रजी तसेच भाषा, गणित, विज्ञान , मूल्यशिक्षण, जीवन कौशल्य, पर्यावरण शिक्षण, दिव्यांग शिक्षण, किशोरीचे शिक्षण, अंगणवाडी ताईना बालशिक्षण, शाळा व्यवस्थापन समिती आणि लोकप्रतिनिधीचे प्रशिक्षण अशा सर्व कार्यशाळा, प्रशिक्षणात आपला सक्रिय सहभाग नोंदवला. शिक्षण क्षेत्रातील नामांकित संस्था, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे. राज्य विज्ञान संस्था नागपूर, इंग्रजी भाषा शिक्षण संस्था आणि प्रौढ शिक्षण संस्था संभाजीनगर, यशवंतराव चव्हाण विकास प्रबोधिनी पुणे, सांस्कृतिक शिक्षण व संशोधन संस्था हैदराबाद येथील विविध कार्यशाळात सहभाग घेतला.

वैजनाथ काळे साहेबांच्या व्याख्यानाने शिक्षक मंत्रमुग्ध होऊन, प्रशिक्षणात तल्लीन व्हायचे. दोन - तीन तास ऐकले तरी ऐकतच रहावे अशी त्यांची शैली खुमासदार होती. त्यांच्याकडे अफाट वाचनातून आलेले कोणत्याही विषयांचे प्रगाढ ज्ञान शिक्षकांना मोलाचे मार्गदर्शक ठरले. त्यांच्यातली सकारात्मक ऊर्जा संपूर्ण शिक्षण वतुर्ळास संमोहित करत सर्वांचे हित करीत आलेली आहे. मी स्वतः आणि माझ्यासारखे अनेक शिक्षक काळे साहेबांनी घडविले आहेत. शाळेत विद्यार्थ्यांना शिकवताना बालभारतीच्या पाठ्यपुस्तकातले श्रेयनामावली विराजमान असलेले वैजनाथ काळे हे नाव मी विद्यार्थ्यांना आवर्जून दाखवत 'हे साहेब माझे मार्गदर्शक आहेत' असे आजही सांगतो. लेकरं अवाक होतात. आनंदून, आतून अभिमानाने फुलतो.

मागील तीस वर्षापासून महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे येथील अनेक कार्यशाळेत, प्रशिक्षण साहित्य निर्मितीमध्ये, पायाभूत चाचणी आणि संकलित मूल्यमापन भाषा विषयाच्या प्रश्नपत्रिका विकसन शिक्षक मार्गदर्शिका विकसन, महात्मा फुले शिक्षण हमी योजना केंद्राच्या मार्गदर्शिका, राजीव गांधी संधी शाळा मार्गदर्शिका निर्मिती, आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळाची सेतू पुस्तिका निर्मिती सक्रिय सहभाग घेतला. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० यामध्ये अभ्यासक्रम निर्मिती अध्ययन निष्पत्ती लेखन, इयत्ता तिसरीचे राज्यस्तरीय प्रशिक्षण घटक संच निर्मिती, सेतू अभ्यास, कार्यपुस्तिका निर्मिती यामध्येही काम करण्याची संधी मिळाली.

**'बालकामगार ते बालभारती' ही अविस्मरणीय, ऐतिहासिक बाब आहे.**

इयत्ता तिसरीमध्ये असताना भूगोलाच्या नकाशातील उपदिशांचा उच्चार नीट करता आला नाही. त्यामुळे शिक्षकांनी रट्टे, फटके दिले होते आणि ते सहन न झाल्यामुळे शाळा सोडून घरी राहून घरची गाई जनावरे, राखणे शेतामध्ये फिरणे यामध्ये शाळा काळात खंड पडला होता. पण आईने हात धरून शाळेत नेऊन बसवले आणि पुढची शाळा सुरू झाली.

मागील पंचवीस वर्षापासून महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ बालभारती, पुणे येथे विविध विषयाचे समिती सदस्य म्हणून काम करण्याची मोठी संधी मिळाली. इयत्ता तिसरी, चौथी, पाचवी परिसर अभ्यास, सहावी ते बारावी इतिहास, नागरिकशास्त्र, राज्यशास्त्र नववी ते बारावी संरक्षणशास्त्र या विषयात पाठ लेखन, स्वाध्याय लेखन म्हणून काम करता आले. बालभारतीमधील समीक्षण सत्रात, उद्बोधन सत्रात, चर्चासत्रात आणि विविध कार्यशाळेत सतत सहभागी होता आले. बालभारतीत मोगल जाधव, डॉ. वर्षा सरोदे, डॉ.अजय कुमार लोळगे, डॉ. सदानंद मोरे , डॉ. आ.ह. साळुंके, डॉ. सुधीर निकम, डॉ.यशवंत सुमंत, डॉ. राजा दीक्षित, डॉ. शैलेंद्र देवळाणकर, डॉ. गणेश राऊत, डॉ.अत्रे मॅडम, डॉ. सोमनाथ रोडे, डॉ. मोहन खडसे, डॉ. शिवानी लिमये, सुभाष राठोड यांच्या सोबत काम करण्याचे भाग्य लाभले.

महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळामार्फत प्रकाशित झालेल्या सामाजिक शास्त्र विषयाच्या विद्यार्थी, शिक्षक कृतिपुस्तिका इयत्ता तिसरी ते बारावी लेखन कार्यात सहभाग मिळाला. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे येथे इयत्ता दहावी ,बारावी मूल्यमापन आराखडा आणि प्रश्नपत्रिका विकसन यामध्ये सुद्धा काम करण्याची संधी मिळाली. महाराष्ट्र राज्याच्या २०१२ आणि २०२४ अभ्यासक्रम निर्मिती मध्ये सक्रिय सहभाग झाला.

**विविध सन्मान**

शिक्षक, केंद्रप्रमुख पदावर कार्यरत असताना पंचायत समिती भोकर आणि देगलूर येथे उत्कृष्ट शिक्षक केंद्रप्रमुख म्हणून पंचायत समितीतर्फे सन्मान झाला. जिल्हा परिषद नांदेड येथे जिल्ह्यातील उत्कृष्ट केंद्रप्रमुख म्हणून तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी आणि शिक्षणाधिकारी डॉ. सविता बिरगे मॅडम, माधवराव सलगर साहेब, ज्ञानोबा बने साहेबांच्या हस्ते सत्कार व सन्मान झाला. मा. डॉ. पुरुषोत्तम भापकर साहेब विभागीय महसूल आयुक्त, संभाजीनगर यांनी संभाजीनगर येथे बोलावून शिक्षणाचे शिलेदार म्हणून सन्मान केला. तसेच त्यांच्या पुस्तकात श्री वैजनाथ काळे यांच्या कार्याचा गौरव करणारे लेख स्वतः भापकर साहेबांनी लिहिलेले आहेत. माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे अध्यक्षा डॉ. शकुंतला काळे यांच्या हस्ते बोर्ड कार्यालय पुणे येथे सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. तत्कालीन शिक्षण मंत्री माननीय विनोद तावडे साहेब यांच्या हस्ते श्री वैजनाथ काळे सरांचा सत्कार आणि सन्मान झाला.

सततचे वाचन, चिंतन, लेखन यातून यातून आपले व्यक्तिमत्व घडवण्यासाठी खूप मदत झाली. वर्तमानपत्रातून, शैक्षणिक मासिके प्रासंगिक व शैक्षणिक लेख प्रकाशित झाले. आकाशवाणी परभणी केंद्रावरून युवा दर्पण आणि लोकजागर या कार्यक्रमात आपले विचार मांडण्याची संधी मिळाली. एकूण एकोणचाळीस वर्षाच्या आपल्या प्रदीर्घ सेवेत अनेक विद्यार्थी, शिक्षक, पालक, वरिष्ठ अधिकारी यांचा सहवास मिळाला त्यांच्याकडून खूप शिकता आले. अनेक जणांच्या जडणघडणीमध्ये सहभाग मिळाला. आतापर्यंत सीसीआरटीच्या राष्ट्रीय स्तरावर प्रशिक्षणात तीस शिक्षकांना संधी मिळाली. बालभारतीच्या विविध विषयाच्या समीक्षण सत्रात नांदेड जिल्ह्यातील आणि राज्यातील तळागाळात कर्तव्य बजावणाऱ्या तीस शिक्षकांना सहभागी करून घेतले.

माझ्यासह इतर अनेक शिक्षकांना केंद्र शासनाच्या सिसीआरटी च्या स्वर्गीय आनंद देणाऱ्या, राष्ट्र घडविणाऱ्या प्रशिक्षणास काळे साहेबांनी देशभर पाठवले आहेत. या प्रशिक्षणात संपूर्ण देशातील सर्व राज्यांतील निवडक शिक्षकांचा समावेश होतो. त्यातून विविध राज्यांतील विविधता, संस्कृती शिक्षकांना संस्कारित करते. अनुभवता येते. सेवा कार्याच्या व्यवसाय समाधानातून शिक्षक मुख्याध्यापक आणि सहकारी यांनी सहकार्य, केंद्रप्रमुख, शिक्षण विस्तार अधिकारी आणि गटशिक्षणाधिकारी शिक्षणाधिकारी या सर्व वरिष्ठाबाबत कृतज्ञता भाव आणि आयुष्यभर कर्मरत राहून, ज्ञानसंपादन, कठोर परिश्रम, विद्यार्थी हित ही शिदोरी सोबत घेऊन सेवानिवृत्त होताना व्यवसायाचा मानसिक आनंद आहे. ही भावना त्यांनी श्री वैजनाथ काळे साहेबांनी व्यक्त केली.

**- विलास कोळनूरकर**
प्राथमिक शिक्षक, जि. प. प्रा. शाळा, वाडी धानोरा, ता. उमरी, जि. नांदेड.
मो.९५११६०१२३३

# 'कृत्रिम बुद्धिमत्ते'मध्ये आत्मनिर्भरता अनिवार्यच !

**अमेरिकेच्या वाणिज्य विभागाने गेल्या सप्ताहात घेतलेल्या एका अभूतपूर्व निर्णयाने जागतिक तंत्रज्ञान क्षेत्रात मोठी खळबळ उडाली. अमेरिकन सरकारने 'अँथ्रॉपिक' या अग्रगण्य कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) क्षेत्रातील कंपनीला त्यांचे अत्यंत प्रगत मॉडेलक्लोड फेबल ५ आणि मायथोस ५ सर्व परदेशी नागरिकांसाठी तातडीने बंद करण्याचे आदेश दिले. परिणामतः अँथ्रॉपिकला जगभरातील सर्वच ग्राहकांसाठी ही दोन्ही मॉडेल्स पूर्णपणे बंद करावी लागली. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रासाठी ही धोक्याची घंटा असून या क्षेत्रात भारताला आता आत्मनिर्भरतेशिवाय पर्याय नाही. त्याचा घेतलेला वेध......**

जगातील सर्वात वेगाने वाढणारी कृत्रिम बुद्धिमत्तेची( एआय) बाजारपेठ म्हणून भारत ओळखला जातो. त्याचप्रमाणे संगणक प्रणाली विकसन क्षेत्रासाठी ही मोठी संधी आहे. परंतु, यातील महत्वाची अडचण म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारलेले बहुतांश स्टार्टअप्स, फिनटेक सेवा आणि शैक्षणिक ॲप्स हे अमेरिकन कंपन्यांच्या (OpenAI, Google, Anthropic) पायाभूत मॉडेल्सवर आधारित आहेत. त्या पार्श्वभूमीवर अमेरिकेने घेतलेला निर्णय आपल्या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रासाठी अत्यंत धक्कादायक ठरला आहे. या निर्णयामुळे पुन्हा एकदा एका कटू जागतिक वास्तवाला आपल्याला सामोरे जावे लागत आहे. यातील महत्त्वाची गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की आपला देश अद्यापही मूलभूत कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानावर संपूर्ण नियंत्रण ठेवू शकत नाही. त्यासाठी आपण अमेरिकेतील मोठ्या तंत्रज्ञान कंपन्यांवर अवलंबून आहे. त्यामुळे असे तंत्रज्ञान विकसित करणाऱ्या देशांच्या मनमानी व राजकीय धोरणावर आपल्याला अवलंबून राहण्याशिवाय सध्या पर्याय नाही. अँथ्रोपिकच्या निर्णयामुळे ही गोष्ट पुन्हा एकदा अधोरेखित झालेली आहे. भारतासाठी ही केवळ एका परदेशी कंपनीने सेवा बंद केल्याची घटना नाही, तर ती 'आय सार्वभौमत्व' आणि 'आत्मनिर्भरते'च्या आवश्यकतेवर बोट ठेवणारी एक मोठी धोक्याची घंटा आहे. कारण नजीकच्या काळात कृत्रिम बुद्धिमत्ता हे केवळ आर्थिक घडामोडीच नाही, तर सार्वजनिक सेवा, संरक्षण सज्जता आणि ज्ञानाची उपलब्धता या सर्वच गोष्टींची दिशा ठरवणार आहे.

अँथ्रॉपिकच्या निर्णयाचा भारतावरील प्रभाव !

अँथ्रॉपिकच्या 'फेबल ५' आणि 'मायथोस ५' या मॉडेल्सवर घालण्यात आलेल्या बंदीचे मुख्य कारण म्हणजे या मॉडेल्समधील 'जेलब्रेक' ची शक्यता. या मॉडेल्सचा वापर सायबर हल्ल्यांसाठी सॉफ्टवेअरमधील त्रुटी शोधण्यासाठी केला जाऊ शकतो, असा अमेरिकन प्रशासनाचा दावा आहे. भारतावर याचा थेट प्रभाव प्रामुख्याने पुढील दोन पातळ्यांवर जाणवतो. एका पातळीवर प्रगत तंत्रज्ञानाचा अचानक संकोच झालेला आहे. भारतीय कंपन्या व प्रणाली विकसक या प्रगत साधनांच्या मदतीने सायबर सुरक्षा आणि क्लिष्ट कोडिंगचे काम करत होते त्यांच्यासाठी हे मार्ग रात्रीतून बंद झाले आहेत. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे यामध्य धोरणात्मक असुरक्षितता निर्माण झाली आहे. भारतीय कंपनी क्षेत्राला हे उमजले आहे की पाश्चिमात्य सरकारांच्या एका स्वाक्षरीने त्यांचे कोट्यवधी रुपयांचे कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित प्रकल्प एका रात्रीत कोलमडू शकतात.

अमेरिकन सरकारने घेतलेल्या या निर्णयामुळे होणारे फायदे तोटे हेही आपण लक्षात घेण्याची गरज आहे. सर्वात महत्त्वाचा तोटा म्हणजे आपल्या माहिती तंत्रज्ञान क्षेत्राला जागतिक स्पर्धेत खीळ बसणार आहे. अत्याधुनिक कृत्रिम बुद्धिमत्ता साधनांच्या अभावामुळे भारतीय तंत्रज्ञान कंपन्यांना जागतिक स्पर्धेत टिकून राहणे आव्हानात्मक होईल. दुसरा महत्त्वाचा तोटा म्हणजे भारतीय उद्योगांना आता इतर पर्यायी मॉडेल्स शोधावे लागतील किंवा कमी क्षमतेच्या जुन्या मॉडेल्सवर काम करावे लागेल. यामुळे सध्याच्या सर्व प्रकल्पांचा खर्च वाढणार असून वेळेमध्ये ही कामे पूर्ण न झाल्यामुळे प्रकल्पांसाठी आणखी विलंब विलंब होणार आहे. त्याचप्रमाणे भारतीय कंपन्यांचे परदेशी पायाभूत सुविधांवर अवलंबित्व वाढणार आहे. भारताकडे स्वतःचे सुपरकॉम्प्युटिंग ग्रिड्स आणि प्रचंड डेटा सेंटर्स नसल्याने, आपण अजूनही क्लाउड कॉम्प्युटिंगसाठी AWS> किंवा Microsoft सारख्या परदेशी प्लॅटफफॉर्मवरच अवलंबून आहोत. ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. त्यामुळे या सर्व क्षेत्रात आत्मनिर्भर होण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय आपल्यासमोर नाही.

अमेरिकन सरकारच्या या निर्णयाचा सर्वात महत्त्वाचा फायदा म्हणजे देशातील स्वदेशी चळवळीला यानिमित्ताने मोठी गती मिळणार आहे. या निर्णयाने भारताला आत्मनिर्भरतेचे महत्त्व पटवून दिले आहे. ही बंदी म्हणजे भारतासाठी स्वतःची स्वतंत्र कृत्रिम बुद्धिमत्ता परिसंस्था उभी करण्याची सुवर्णसंधी आहे. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे केंद्र सरकारने काही महिन्यापूर्वी ' इंडिया ए आय मिशन' घोषित केलेले आहे. त्यासाठी दहा हजार कोटी रुपयांची तरतूद केंद्र सरकारने केलेली आहे. या पार्श्वभूमीवर हा प्रकल्प अत्यंत गांभीर्याने व आणखी वेगाने राबवता येऊ शकतो. आत्मनिर्भरतेकडे वाटचाल केल्याने देशांतर्गत स्थानिक संशोधनाला पाठबळ लावणार आहे. सर्व 'एआय' सारख्या स्थानिक स्टार्टअप्सना सरकारी आणि खाजगी क्षेत्रातून अधिक निधी मिळण्यास मदत होईल.

भारताच्या आत्मनिर्भर कृत्रिम बुद्धिमत्तेचे पाच स्तर असून ते यशस्वीपणे साध्य करण्यासाठी आपल्याला पुढील पाच विविध पातळ्यांवर एकाच वेळी काम करण्याची आवश्यकता आहे.

**१. सेमिकंडक्टर्स आणि प्रोसेसर्स:** कॉम्प्युटिंग पॉवर हा कृत्रिम बुद्धिमत्तेचा पाया आहे. टाटा समूहासारख्या कंपन्यांनी 'मेड-इन-इंडिया' चिपसेट बनवण्याची तयारी सुरू केली असली, तरी प्रगत नॅनोमीटर क्षमतेमध्ये आपण अजूनही जागतिक स्तरावर खूप मागे आहोत. या क्षेत्राला तातडीने मोठ्या प्रमाणावर अर्थसहाय्य व पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची गरज आहे.

२. डेटा सेंटर पायाभूत सुविधा: भारतात डेटा सेंटर्समध्ये अब्जावधी डॉलर्सची गुंतवणूक अनेक मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्या करत आहेत. त्यामुळे आवश्यक पायाभूत सुविधा बळकट होत आहेत.

३. ॲप्लिकेशन्स: भारतीय संगणक प्रणाली तज्ज्ञ आरोग्य, शिक्षण, कृषी आणि प्रशासन या क्षेत्रांत स्थानिक समस्या सोडवणारे ॲप्स बनवण्यात यशस्वी ठरत आहेत. त्यामुळे त्याचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जाऊ शकतो.

४. सार्वभौम कृत्रिम बुद्धिमत्ता मॉडेल्स विकसित करण्याची भारताला मोठी संधी यानिमित्ताने मिळणार आहे. त्यासाठी भारताला आपल्या भाषा व संस्कृतीशी सुसंगत असणारी स्वतःची राष्ट्रीय भाषा मॉडेल्स तयार करण्याची मोठी संधी उपलब्ध होणार आहे.

५. ऊर्जा: कृत्रिम बुद्धिमत्ता यंत्रणा निर्माण करणे व चालवणे या दोन्हीसाठी मोठ्या प्रमाणावर विजेची गरज लागते. यानिमित्ताने भारताला अणुऊर्जा व नूतनीकरणक्षम ऊर्जेचा वेगवान विस्तार करण्याची संधी लाभणार आहे.

गेल्या अनेक वर्षांमध्ये या क्षेत्रामध्ये गुंतवणूक करण्यामध्ये खाजगी क्षेत्राची उदासीनता मोठ्या प्रमाणावर जाणवत आहे. त्यामुळे केंद्र सरकारने याबाबतची भूमिका बदलून खाजगी क्षेत्राच्या मदतीने कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील संशोधन व विकासामध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक कशी करता येईल यासाठी स्वतंत्र राष्ट्रीय धोरण राबवण्याची गरज आहे. अन्य देशांनी किंवा बहुराष्ट्रीय कंपन्यांनी विकसित केलेल्या तंत्रज्ञानाचा वापर करून उद्योग क्षेत्रात नफा मिळवण्याचा जुना दृष्टिकोन बदलण्याची नितांत गरज आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता हे क्षेत्र सामाजिक माध्यमासारखे म्हणजे सोशल मीडिया सारखे चालणारे नाही. 'नेटवर्क इफेक्ट'मुळे नवीन कंपन्यांना प्रवेश कठीण असतो. कृत्रिम बुद्धिमत्तेचे स्वरूप प्रामुख्याने वैयक्तिक किंवा संस्थात्मक असल्याने, येथे दर्जेदार आणि परवडणारे मॉडेल्स बनवून स्पर्धा करणे शक्य आहे. त्यासाठी केंद्र सरकारने काही सकारात्मक पावले उचलण्याची नितांत आवश्यकता आहे. यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांसाठी दहा वर्षांची संपूर्ण कर सवलत देण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे सर्व सरकारी विभागांमध्ये भारतीय कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित असलेल्या मॉडेलचा मॉडेल्स चा वापर करणे व त्याची खरेदी करणे हे आत्मनिर्भरतीकडे नेणारे खरेदी धोरण स्वीकारले पाहिजे.

देशामधील सर्व विद्यापीठांमध्ये माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता संशोधनासाठी मोठ्या प्रमाणावर भरीव निधी उपलब्ध करून देण्याची हीच वेळ आणि संधी आहे. अँथ्रॉपिकच्या प्रकरणाने हे स्पष्ट केले आहे की कृत्रिम बुद्धिमत्ता हा केवळ व्यावसायिक विषय नसून तो आता एक 'जिओपॉलिटिकल' आणि सार्वभौमत्वाचा मुद्दा बनला आहे. भारताला जर महासत्ता बनायचे असेल, तर आपल्याला तंत्रज्ञानाचा केवळ 'ग्राहक' राहून चालणार नाही, तर तंत्रज्ञानाचा 'निर्माता' व्हावे लागेल. 'आत्मनिर्भर कृत्रिम बुद्धिमत्ता' ही आता केवळ एक घोषणा नसून, भारताच्या भविष्यातील अस्तित्वाची आणि सार्वभौमत्वाची खरी लढाई आहे.

**- प्रा. नंदकुमार काकिर्डे**
(प्रस्तुत लेखक पुणे स्थित अर्थविषयक जेष्ठ पत्रकार असून माजी शेअर बाजार व बँक संचालक आहेत).

# तुटलेल्या तारा, ट्रान्सफॉर्मर व विजेच्या खांबांपासून सावध राहा

## पावसाळ्यात विद्युत दुर्घटना टाळा; महावितरणचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि. ३ (प्रतिनिधी) – पावसाळ्याला सुरुवात होताच वादळी वारे, विजांचा कडकडाट आणि मुसळधार पावसामुळे विद्युत दुर्घटनांचा धोका वाढतो. तुटलेल्या विजेच्या तारा, विजेचे खांब, ट्रान्सफॉर्मर, फिडर पिलर तसेच शॉर्ट सर्किटमुळे अपघात होऊन जीवितहानी होण्याची शक्यता असते. त्यामुळे विद्युत यंत्रणेपासून दूर राहून नागरिकांनी विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन महावितरणचे मुख्य अभियंता दीपक कुमठेकर यांनी केले आहे.

महावितरणने दिलेल्या माहितीनुसार, अतिवृष्टी आणि वादळामुळे विजेच्या तारा तुटणे, खांब कोसळणे, ट्रान्सफॉर्मरमध्ये ठिणग्या पडणे किंवा शॉर्टसर्किट होणे अशा घटना घडू शकतात. अशा वेळी लोंबकळणाऱ्या किंवा तुटलेल्या तारांना स्पर्श करू नये. ट्रान्सफॉर्मर, फिडर पिलर किंवा विजेच्या खांबाजवळ शॉर्टसर्किट झाल्यास त्या परिसरात जाणे टाळून तातडीने महावितरणला माहिती द्यावी.

पावसाळ्यात घरातील ओलसर विद्युत उपकरणे, शेती पंपावरील स्विचबोर्ड तसेच उघड्या विद्युत तारा यांच्यामुळेही अपघात होऊ शकतात. त्यामुळे नागरिकांनी घर, सोसायटी आणि परिसरातील विद्युत यंत्रणा सुरक्षित असल्याची खात्री करून घ्यावी. पत्र्याच्या घरांमध्ये राहणाऱ्यांनीही आवश्यक सुरक्षात्मक उपाययोजना कराव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.

विजेच्या खांबांना जनावरे बांधू नयेत किंवा दुचाकी टेकवून ठेवू नयेत, तसेच पूरस्थितीत नदीकाठच्या भागात विशेष दक्षता घ्यावी. भूमिगत वीजवाहिन्यांमध्ये पाणी शिरणे, झाडे कोसळणे किंवा वीज पडल्याने वीजपुरवठा खंडित होण्याबरोबरच जीवितास धोका निर्माण होऊ शकतो.

### येथे साधा संपर्क

अतिवृष्टी, वादळ किंवा इतर नैसर्गिक आपत्तीमुळे वीजवाहिन्या तुटणे, खांब कोसळणे अथवा विद्युत दुर्घटनेची शक्यता निर्माण झाल्यास अथवा कोणतीही धोकादायक घटना आढळल्यास नागरिकांनी त्याची माहिती महावितरणच्या मध्यवर्ती ग्राहक सेवा केंद्राशी १९१२ या हेल्पलाईन क्रमांकावर किंवा १८००-२१२-३४३५ व १८००-२३३-३४३५ या टोल-फ्री क्रमांकांवर किंवा स्थानिक नियंत्रण कक्षाच्या ७०६६०४२४१२ (छत्रपती संभाजीनगर शहर मंडल), ७८७५७५६६५२ (छत्रपती संभाजीनगर ग्रामीण मंडल) व ७८७५७६४१४४ (जालना मंडल) या क्रमांकांवर तात्काळ द्यावी, असे आवाहन महावितरणने केले आहे.

# रोजगार हमीपलीकडे : विकसित गावांच्या नव्या युगाची सुरुवात; 'विकसित भारत-जी-राम-जी' कायदा ग्रामीण भारताच्या विकासाची व्याख्या बदलणार

**दोन** दशकांहून अधिक काळ ग्रामीण भारताच्या रोजगार सुरक्षेचा आधार ठरलेली मनरेगा योजना आता नव्या स्वरूपात पुढे आली आहे. 'विकसित भारत – जी-राम-जी' हा कायदा १ जुलै २०२६ पासून देशभर लागू झाला आहे. नुकताच २ जुलै रोजी या योजनेचा केंद्रीय कृषी आणि ग्राम विकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या हस्ते देशव्यापी शुभारंभ करण्यात आला. पहिल्या दृष्टीक्षेपात हा बदल केवळ १०० दिवसांच्या रोजगार हमीऐवजी १२५ दिवसांची हमी देणारा वाटू शकतो; परंतु प्रत्यक्षात या कायद्याचा गाभा रोजगारापेक्षा गावाच्या विकास नियोजनात आहे. ग्रामीण भारताच्या विकासाची दिशा, ग्रामपंचायतींची भूमिका आणि विविध शासकीय योजनांच्या अंमलबजावणीची पद्धत बदलण्याचा हा महत्त्वपूर्ण प्रयत्न आहे.

या कायद्यातील सर्वांत मोठा बदल म्हणजे 'विकसित ग्रामपंचायत आराखडा'. आजपर्यंत अनेक गावांमध्ये विकासकामे उपलब्ध निधी किंवा विभागीय योजनांनुसार निश्चित केली जात होती.

आता प्रत्येक गावाने स्वतःच्या गरजा ओळखून ग्रामसभेच्या माध्यमातून पुढील काही वर्षांसाठी विकास आराखडा तयार करायचा आहे. गावात पाण्याची टंचाई कोठे आहे, कोणत्या शेतकऱ्यांना सिंचनाची गरज आहे, कुठे शेततळी आवश्यक आहेत, कोणत्या वस्तीला रस्ता हवा, कुठे वृक्षलागवड करायची, पशुपालन, रेशीम उद्योग, मत्स्यव्यवसाय, महिला बचत गट, युवकांचा कौशल्य विकास, तसेच हवामान बदलाशी सुसंगत कामे, या सर्व बाबींचा विचार एकाच आराखड्यात केला जाणार आहे. म्हणजेच आता ही केवळ 'काम शोधून देणारी योजना' न राहता 'विकास नियोजनावर आधारित रोजगार' ही संकल्पना प्रत्यक्षात येणार आहे.

या कायद्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे विविध विभागांच्या योजनांचा समन्वय. आतापर्यंत कृषी, जलसंधारण, ग्रामविकास, वन, पशुसंवर्धन, पंचायत राज, महिला व बालविकास आदी विभागांच्या योजना स्वतंत्रपणे राबवल्या जात होत्या. परिणामी, अनेकदा एकाच गावात विविध विभागांकडून कामे झाली; मात्र त्यांच्यात परस्पर सुसंगती नव्हती. आता 'विकसित ग्रामपंचायत आराखडा' हा सर्व योजनांसाठी समान विकास आराखडा ठरणार आहे. त्यामुळे निधीचा अधिक परिणामकारक वापर होईल आणि निर्माण होणाऱ्या मालमत्ता दीर्घकाळ उपयुक्त ठरतील. हा बदल केवळ प्रशासकीय नसून विकासाच्या विचारपद्धतीतील मूलभूत परिवर्तन आहे.

ग्रामीण मजुरांच्या दृष्टीनेही हा कायदा महत्त्वाचा आहे. रोजगाराची कायदेशीर हमी १०० दिवसांवरून १२५ दिवसांपर्यंत वाढविण्यात आली आहे. कामाची मागणी करूनही विहित मुदतीत रोजगार उपलब्ध झाला नाही, तर बेरोजगारी भत्त्याची तरतूद कायम ठेवण्यात आली आहे. मजुरी वेळेत देणे बंधनकारक करण्यात आले असून विलंब झाल्यास भरपाई देण्याची व्यवस्थाही करण्यात आली आहे. महाराष्ट्रासाठी चालू आर्थिक वर्षातील दैनंदिन मजुरी ३१७ रुपये निश्चित करण्यात आली आहे. त्यामुळे ग्रामीण कुटुंबांच्या उत्पन्न सुरक्षेला अधिक बळ मिळण्याची अपेक्षा आहे. या कायद्यामुळे ग्रामसभेचे महत्त्वही लक्षणीयरीत्या वाढणार आहे. कोणती कामे करायची, कोणत्या कामांना प्राधान्य द्यायचे आणि गावाचा विकास कोणत्या दिशेने करायचा, याचा निर्णय आता ग्रामसभेतील चर्चेतून होणार आहे. लोकसहभागाशिवाय 'विकसित ग्रामपंचायत आराखडा' प्रभावी ठरू शकत नाही. त्यामुळे ग्रामसभा ही केवळ औपचारिक बैठक न राहता गावाच्या विकासाचे निर्णय घेणारे प्रभावी व्यासपीठ बनणे आवश्यक आहे.

विशेष म्हणजे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, महिला, दिव्यांग, भूमिहीन आणि इतर वंचित घटकांच्या गरजांचाही विकास आराखड्यात स्वतंत्रपणे विचार करण्यावर भर देण्यात आला आहे.

या कायद्याचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे तंत्रज्ञानाचा व्यापक वापर. डिजिटल नोंदणी, ई-केवायसी, ऑनलाइन उपस्थिती, जीआयएस-आधारित नियोजन, पोर्टलवर कामांची माहिती, निधी वितरणाचे डिजिटल व्यवस्थापन आणि सामाजिक लेखापरीक्षण यांमुळे पारदर्शकता वाढण्याची अपेक्षा आहे. यामुळे केवळ कामांची नोंद ठेवली जाणार नाही, तर निर्माण झालेल्या मालमत्तेचा प्रत्यक्ष उपयोग, गुणवत्ता आणि परिणामकारकताही तपासता येईल. गावांचा विकास डेटा-आधारित पद्धतीने मोजण्याची संधी या प्रणालीमुळे उपलब्ध होणार आहे.

महाराष्ट्राच्या दृष्टीने या कायद्यात मोठी संधी दडलेली आहे. राज्यात जलसंधारण, शेततळी, सिंचन विहिरी, फळबागा, रेशीम उद्योग, पशुपालन, चारागाह विकास, गाव तलावांचे पुनरुज्जीवन, ग्रामीण रस्ते आणि हवामान बदलाशी सुसंगत शेती यांसारख्या कामांना चालना देता येईल. विशेषतः दुष्काळग्रस्त भागांत पाणलोट विकास, पश्चिम महाराष्ट्रात जलव्यवस्थापन आणि विदर्भ-मराठवाड्यात नैसर्गिक संसाधन संवर्धनासाठी या कायद्याचा प्रभावी वापर होऊ शकतो. रोजगार उपलब्ध करून देतानाच उत्पादनक्षम आणि शाश्वत मालमत्ता निर्माण करण्याची संधी हा या कायद्याचा सर्वांत मोठा लाभ ठरू शकतो. 'विकसित भारत' हे केवळ राष्ट्रीय घोषवाक्य नाही; त्याची सुरुवात प्रत्येक गावातून होणार आहे. त्यामुळे या कायद्याचे यश किती दिवस रोजगार मिळाला यावर नव्हे, तर प्रत्येक गावाने किती सक्षम विकास आराखडा तयार केला, किती शाश्वत मालमत्ता निर्माण केली, ग्रामसभेचा सहभाग किती वाढवला आणि ग्रामीण अर्थव्यवस्था किती सक्षम केली, यावर मोजले जाईल. रोजगार हमी ही या कायद्याची सुरुवात आहे; परंतु विकसित, सक्षम आणि आत्मनिर्भर गावांची निर्मिती हेच त्याचे अंतिम ध्येय आहे.

**– सचिन अडसूळ**
जिल्हा माहिती अधिकारी, कोल्हापूर

# अमरनाथ यात्रेनिमित्त पंतप्रधानांचे भाविकांना पत्र; सुरक्षित यात्रेसह 'पाच संकल्प' करण्याचे आवाहन

नवी दिल्ली, दि. ३ (वृत्तसंस्था) – पवित्र अमरनाथ यात्रेला प्रारंभ झाल्याच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशभरातील भाविकांना उद्देशून विशेष पत्र लिहित शुभेच्छा दिल्या आहेत. बाबा बर्फानींचे दर्शन हे प्रत्येक शिवभक्तासाठी परमभाग्याचे असून अमरनाथ यात्रा ही केवळ धार्मिक श्रद्धेचे नव्हे, तर भारताच्या सांस्कृतिक ऐक्याचेही प्रतीक असल्याचे त्यांनी पत्रात म्हटले आहे.पंतप्रधानांनी भाविकांना सुरक्षित यात्रा करण्याचे, पर्यावरणाचे संरक्षण करण्याचे आणि स्थानिक नागरिकांना सहकार्य करण्याचे आवाहन केले. तसेच श्रद्धा, सेवा आणि राष्ट्रनिर्मितीचा संदेश अधिक प्रभावी करण्यासाठी पाच महत्त्वाचे संकल्प करण्याचेही त्यांनी सुचविले.

पत्रात त्यांनी नमूद केले की, ज्येष्ठ पौर्णिमेच्या प्रथम पूजेनंतर सुरू होणाऱ्या या यात्रेसाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून लाखो भाविक सहभागी होतात. अमरनाथ धामाची यात्रा आध्यात्मिक ऊर्जा प्रदान करण्याबरोबरच विविध राज्ये, भाषा आणि संस्कृतींना एका श्रद्धेच्या धाग्यात बांधणारी असल्याचे त्यांनी म्हटले.यात्रेच्या यशस्वी आयोजनासाठी श्री अमरनाथजी श्राइन बोर्ड, जम्मू-काश्मीर प्रशासन, भारतीय सेना, केंद्रीय राखीव पोलीस दल (सीआरपीएफ), जम्मू-काश्मीर पोलीस, भारत-तिबेट सीमा पोलीस दल (आयटीबीपी), सीमा सुरक्षा दल (बीएसएफ), राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ), डॉक्टर, आरोग्य कर्मचारी, स्वच्छता कर्मचारी आणि स्वयंसेवक यांच्या योगदानाचेही पंतप्रधानांनी कौतुक केले.

**'पाच संकल्प' करण्याचे आवाहन**

पंतप्रधान मोदी यांनी भाविकांना यात्रा मार्गावर स्वच्छता राखणे आणि कचरा न टाकणे, प्रशासन व सुरक्षा यंत्रणांच्या सूचनांचे काटेकोर पालन करणे, प्रतिकूल हवामान लक्षात घेऊन आवश्यक ती खबरदारी घेणे, 'व्होकल फॉर लोकल' उपक्रमांतर्गत यात्रेवरील खर्चातील किमान १० टक्के रक्कम जम्मू-काश्मीरमधील स्थानिक उत्पादने खरेदीसाठी खर्च करणे, तसेच रक्षाबंधनाच्या निमित्ताने 'एक झाड आईच्या नावाने' अभियानात सहभागी होऊन वृक्षारोपण करणे आणि 'राष्ट्र प्रथम' या भावनेने कर्तव्य पार पाडण्याचे आवाहन केले.

पंतप्रधानांनी म्हटले की, अमरनाथ यात्रा ही केवळ भगवान शिवांच्या दर्शनापुरती मर्यादित नसून सेवाभाव, सनातन परंपरा आणि राष्ट्रीय एकात्मतेचे जिवंत उदाहरण आहे. यात्रेदरम्यान स्थानिक नागरिक भाविकांचे आत्मीयतेने स्वागत करतात, तर देशभरातून आलेले भाविक लंगर आणि भंडाऱ्यांद्वारे निःस्वार्थ सेवा देतात. ही परंपरा भारतीय संस्कृतीतील 'सर्वे भवन्तु सुखिनः' या मूल्याला अधिक बळकट करते, असे त्यांनी नमूद केले.

यात्रा सुरक्षित आणि सुरळीत पार पडण्यासाठी हवामानाशी संबंधित इशारे तसेच प्रशासनाने जारी केलेल्या सर्व सूचनांचे पालन करण्याचे आवाहन करत, सुरक्षा दल आणि प्रशासन प्रत्येक भाविकाची यात्रा सुरक्षित करण्यासाठी कटिबद्ध असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

पत्राच्या शेवटी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बाबा अमरनाथांच्या चरणी सर्व भाविकांच्या सुख, समृद्धी आणि उत्तम आरोग्यासाठी प्रार्थना व्यक्त केली. यंदाची अमरनाथ यात्रा श्रद्धा, सेवा, सांस्कृतिक ऐक्य आणि राष्ट्रभक्तीचा भव्य उत्सव ठरेल तसेच प्रत्येक भाविक सुरक्षितपणे आपल्या घरी परतेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# जैन विद्यार्थ्यांसाठी राज्यात सात ठिकाणी वसतिगृह उभारणार

मुंबई, दि. ३ (प्रतिनिधी) –जैन समाजातील विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी मुंबई, नवी मुंबई, पुणेसह राज्यातील एकूण सात ठिकाणी वसतिगृहे उभारण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय जैन अल्पसंख्याक विकास आर्थिक महामंडळाच्या संचालक मंडळाच्या चौथ्या बैठकीत घेण्यात आला. ही बैठक महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथील सह्याद्री अतिथीगृहात पार पडली.

बैठकीत महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या कर्ज व व्याज परतावा योजनांच्या सुधारित प्रारूपास मान्यता देण्यात आली. तसेच 'विहारधाम निर्माण योजना' आणि 'पाठशाळा आधुनिकीकरण व सक्षमीकरण योजना' राबविण्याबाबत सविस्तर चर्चा झाली. राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास व वित्त महामंडळ कडून निधी उपलब्ध करून घेण्यासाठी आवश्यक कार्यवाहीचा आढावा घेण्यात आला. विद्यार्थ्यांच्या वसतिगृह उभारणीसंदर्भात प्राप्त मागण्यांचा विचार करून राज्यातील सात ठिकाणी विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी वसतिगृहे उभारण्याचा निर्णय घेण्यात आला.

याशिवाय, 'मराठी जैन साहित्य विश्वकोष' निर्मितीसाठी कालबद्ध कार्यक्रम निश्चित करण्याचा निर्णय घेण्यात आला. कौशल्य विकास विभागाच्या सहकार्याने जैन युवकांना कौशल्य विकास प्रशिक्षण, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम तसेच इतर रोजगाराभिमुख योजनांचा लाभ मिळावा यासाठी विशेष अभियान राविले जाणार असून महिला व बाल विकास विभागाच्या सहकार्याने महिला बचत गटांसाठी विविध योजना प्रभावीपणे राबविण्याबाबतही चर्चा झाली.

मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनुसार महामंडळाच्या विविध योजनांमध्ये जैन समाजाचा अधिकाधिक सहभाग वाढावा, तसेच योजनांची माहिती समाजातील प्रमुख व्यक्तींपर्यंत पोहोचावी यासाठी नवी दिल्ली येथे विशेष बैठक आयोजित करण्याबाबतही चर्चा करण्यात आली. महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी यांनी पाठपुरावा करून जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळासाठी राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास व वित्त महामंडळाकडून १०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यासाठी नवी दिल्ली येथे झालेल्या सामंजस्य करारात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. याबद्दल समन्वयक संदीप भंडारी यांनी अभिनंदनाचा ठराव मांडला. उपस्थित सर्व सदस्यांनी हा ठराव एकमताने मंजूर करून अध्यक्षांच्या कार्याचे कौतुक केले.

बैठकीस अल्पसंख्याक विकास विभागाच्या सचिव माधवी खोडे-चवरे,अल्पसंख्याक विकास विभागाच्या व्यवस्थापकीय संचालक मेघना शिंदे, महिला आर्थिक विकास महामंडळाच्या कार्यक्रम व्यवस्थापक गौरी दोंदे, वित्त विभागाच्या कार्यासन अधिकारी रचना तळेकर, कौशल्य विकास विभागाचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद माळी, समन्वयक संदीप भंडारी, महामंडळाचे सदस्य रावसाहेब पाटील, सुनील पाटणी तसेच विकास अच्छा, अमित जैन, दर्शना जैन, विश्वजीत कोल्हापुरे आणि प्रशांत गौडाजे उपस्थित होते.

# देवळाईतील प्रगतशील शेतकरी दादासाहेब शिंदे यांना 'वसंतराव नाईक आधुनिक फुलशेती पुरस्कार'

## मुंबईत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते गौरव; आधुनिक फुलशेतीतील उल्लेखनीय कार्याची दखल

छत्रपती संभाजीनगर, दि. ३ (प्रतिनिधी)– छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील देवळाई परिसरातील सिंदोन गावचे प्रगतशील शेतकरी दादासाहेब शिंदे यांना आधुनिक फुलशेती क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल प्रतिष्ठेचा 'वसंतराव नाईक आधुनिक फुलशेती पुरस्कार' प्रदान करण्यात आला आहे.



कृषी दिनानिमित्त १ जुलै रोजी मुंबई येथील यशवंतराव चव्हाण केंद्रात आयोजित भव्य पुरस्कार वितरण सोहळ्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते शिंदे यांना पुरस्कार, सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी पर्यटन मंत्री शंभूराजे देसाई, उद्योग मंत्री उदय सामंत तसेच उद्योग व सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांची प्रमुख उपस्थिती होती.

दादासाहेब शिंदे यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून फुलशेतीमध्ये केलेले नावीन्यपूर्ण प्रयोग, गुणवत्तापूर्ण उत्पादन, बाजारपेठेतील यशस्वी व्यवस्थापन तसेच कृषी क्षेत्रातील मोलाचे योगदान याची दखल घेत वसंतराव नाईक कृषी संशोधन व ग्रामीण विकास प्रतिष्ठानतर्फे त्यांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या सन्मानामुळे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या शेतकरी समुदायाचा गौरव वाढला असून, आधुनिक आणि तंत्रज्ञानाधारित शेतीकडे वाटचाल करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी दादासाहेब शिंदे यांचे कार्य प्रेरणादायी ठरत आहे. त्यांच्या या यशाबद्दल कृषी क्षेत्रासह विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

यापूर्वीही दादासाहेब शिंदे यांना विविध राज्य व राष्ट्रीय पुरस्कारांनी गौरविण्यात आले असून, नुकताच भारतीय कृषी संशोधन संस्था (IARI), नवी दिल्ली यांच्याकडून 'आयएआरआय इन्नोव्हेटिव्ह फार्मर २०२६' हा राष्ट्रीय पुरस्कारही जाहीर झाला आहे. त्यानंतर आता मिळालेला 'आधुनिक फुलशेती पुरस्कार' हा त्यांच्या कार्याला मिळालेला आणखी एक मानाचा सन्मान मानला जात आहे.

या गौरवाबद्दल कृषी क्षेत्रातील तज्ज्ञ, शेतकरी बांधव आणि विविध सामाजिक संस्थांनी दादासाहेब शिंदे यांचे अभिनंदन केले असून, त्यांच्या कार्यामुळे आधुनिक, तंत्रज्ञानाधारित आणि शाश्वत शेतीला अधिक चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# विशिष्ट दुकानातूनच शैक्षणिक साहित्य खरेदीची सक्ती करणाऱ्या शाळांवर राज्य सरकार करणार कठोर कारवाई

मुंबई, दि. ३ (प्रतिनिधी) – विद्यार्थ्यांना विशिष्ट दुकानांतूनच पुस्तके, गणवेश आणि शैक्षणिक साहित्य खरेदी करण्यास भाग पाडणाऱ्या राज्यातील काही खासगी तसेच सीबीएसई, आयसीएसई बोर्डाशी संलग्न शाळांवर शासन कठोर कारवाई करील, असे राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी गुरूवारी विधानपरिषदेत सांगितले.

राज्यातील शाळांमध्ये शैक्षणिक साहित्य विशिष्ट दुकानातून खरेदी करण्याची सक्ती केली जात असल्याबाबत विधानपरिषद सदस्य सुधाकर अडबाले यांनी प्रश्न उपस्थित केला. या चर्चेत सदस्य भाई जगताप, चित्रा वाघ, प्रवीण दरेकर यांनी सहभाग घेतला. या प्रश्नाला उत्तर देताना डॉ. भोयर यांनी स्पष्ट केले की, अशा प्रकारच्या सक्तीला शासनाचा ठाम विरोध असून यापूर्वीही काही शाळांवर कारवाई करण्यात आली आहे. प्रत्येक विभागीय उपसंचालक कार्यालयांतर्गत सहायक संचालकांच्या नियंत्रणाखाली नोडल अधिकारी नेमले जाणार आहेत. या अधिकाऱ्यांमार्फत शाळांमधील खरेदी प्रक्रियेवर बारकाईने देखरेख ठेवली जाईल आणि नियमभंग करणाऱ्या शाळांवर तत्काळ कारवाई केली जाईल.

लोकप्रतिनिधींनी या मुद्द्यावर मांडलेल्या तक्रारींच्या आधारे संबंधित शाळांची स्वतंत्र यादी तयार करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. या यादीच्या आधारे तपासणी करून आवश्यक त्या ठिकाणी दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असेही डॉ. भोयर यांनी नमूद केले.

# जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे ६ जुलै रोजी आयोजन

छत्रपती संभाजीनगर, दि. ३ (प्रतिनिधी) – जिल्ह्यातील नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी आयोजित करण्यात येणारा 'जिल्हास्तरीय लोकशाही दिन' सोमवार, दिनांक ६ जुलै रोजी २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात दुपारी १२ वाजता हा लोकशाही दिन पार पडणार असल्याची माहिती सामान्य प्रशासनाच्या उपजिल्हाधिकारी श्रीमती संगीता राठोड यांनी दिली आहे.

लोकशाही दिना सहभागी होणाऱ्या नागरिकांचे अर्ज सकाळी ११ ते १२ या वेळेतच स्वीकारले जातील.तक्रार वैयक्तिक असावी आणि अर्ज विहित नमुन्यात असणे अनिवार्य आहे. यापूर्वी तालुकास्तरीय लोकशाही दिनात अर्ज दिला असल्यास, त्याची पोहोच पावती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व अपिल, सेवाविषयक व आस्थापनाविषयक बाबी, यापूर्वी लोकशाही दिनात दाखल केलेले अर्ज यात स्वीकारले जाणार नाही असे सुचित केले आहे.

नागरिकांना लोकशाही दिनाचा लाभ घेण्यासाठी वेळेत उपस्थित राहण्याचे आवाहन सामान्य प्रशासन विभागाच्या उपजिल्हाधिकारी संगीता राठोड यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# सबळ शेतकरी, समृद्ध महाराष्ट्र !

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ ही महाराष्ट्राच्या इतिहासातील सर्वात व्यापक, तांत्रिकदृष्ट्या प्रगत अशी योजना आहे. थकीत कर्जाचा डोंगर उपसल्यामुळे ५६ लाख शेतकरी पुन्हा एकदा बँकिंग प्रवाहाशी जोडले जातील, ज्यामुळे त्यांना नवीन तंत्रज्ञान आणि बी-बियाणांसाठी पतपुरवठा उपलब्ध होईल. संपूर्ण कर्जमुक्ती, एकवेळ समझोता आणि नियमित परतफेड करणाऱ्यास प्रोत्साहनपर लाभांबाबत आपण यापूर्वीच्या लेखात समजून घेतलं. आज आपण या योजनेसाठी अपात्रताधारक कोण असतील, याबाबतही चर्चा करू.

ही योजना केवळ एक कर्जमाफीची वा कर्जमुक्तीची घोषणा नाही, तर तंत्रज्ञानाची अचूक जोड देऊन राबवली जाणारी एक ऐतिहासिक मोहीम आहे. या पारदर्शक पद्धतीमुळे मध्यस्थांचा सुळसुळाट थांबेल आणि आर्थिक मदत थेट शेतकऱ्याच्या खात्यात जमा होईल. आता गरज आहे ती फक्त एकाच गोष्टीची- शेतकऱ्यांनी जागरूक राहून आपले डिजिटल प्रमाणीकरण वेळेवर पूर्ण करण्याची ! तरच या ऐतिहासिक योजनेचा खरा उद्देश सफल होण्यास मदत होईल.

कर्जाच्या ओझ्याखाली ५६ लाख शेतकऱ्यांना या योजनेमुळे पुन्हा एकदा आत्मविश्वासाने शेती करण्यासाठी बळ मिळणार आहे. २ लाखांची मुदत, ध्ऊए मधील लवचिकता आणि नियमित कर्जदारांना दिलेले प्रोत्साहन यांमुळे ही योजना मागील योजनांपेक्षा अधिक सर्वसमावेशक ठरणारी आहे.

पात्र शेतकऱ्यांना लाभ मिळणारच. पण या योजनेतील अपात्रताधारक कोण आहेत, याचीही माहिती असणे आवश्यक आहे. या योजनेत राजकीय, सहकारी संस्थांचे पदाधिकारी, सरकारी कर्मचारी, सार्वजनिक उपक्रमातील कर्मचारी, शेतीव्यतिरिक्त उत्पन्नावर आयकर भरणारे व्यक्ती, निवृत्तीवेतनधारक अपात्र ठरविण्यात आले आहेत. सहकारी साखर कारखान्यांचे हंगामी कामगार मात्र, या योजनेसाठी पात्र असतील.

आजी- माजी मंत्री, खासदार, आमदार, जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्य, नगरसेवक, केंद्र व राज्य सरकारचे कर्मचारी, अधिकारी ज्यांचे मासिक वेतन २५,००० पेक्षा जास्त आहे. महावितरण, महाराष्ट्र राज्य औद्योगिक महामंडळ, राज्य परिवहन महामंडळ इ. मधील २५,००० पेक्षा जास्त वेतन असलेले कर्मचारी, शेतीव्यतिरिक्त उत्पन्नावर आयकर भरणाऱ्या व्यक्ती., ज्यांचे मासिक पेन्शन २५,००० पेक्षा जास्त आहे (माजी सैनिक वगळून)., कृषी उत्पन्न बाजार समित्या, सहकारी साखर कारखाने, सहकारी सूतगिरण्या, नागरी सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., सहकारी दूध संघ या संस्थांचे पदाधिकारी (अध्यक्ष, उपाध्यक्ष व संचालक मंडळ), अधिकारी व कर्मचारी ज्यांचे एकत्रित वेतन रूपये २५ हजार पेक्षा जास्त असणाऱ्या व्यक्ती योजनेसाठी अपात्र असतील.

केवळ शेतकऱ्यांना थकबाकी मुक्त करणे, हा या योजनेचा उद्देश नाही. शेतकऱ्याला पुन्हा आत्मविश्वासाने उभे करणे, ग्रामीण अर्थव्यवस्थेला गती देणे, हे मुख्य ध्येय आहे. 'सबळ शेतकरी, समृद्ध महाराष्ट्र' या मंत्राचा उच्चार करत, ही योजना राज्याच्या कृषी क्षेत्रासाठी खऱ्या अर्थाने एक मैलाचा दगड ठरेल यात शंका नाही. **(क्रमशः)**

**-डॉ. श्याम टरके,**
सहायक संचालक
(माहिती) विभागीय माहिती
कार्यालय, लातूर

सोमवार खेरीज दररोज
प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक
श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# छत्रपती संभाजीनगरमध्ये दमदार पाऊस; नद्यांच्या पाणीपातळीत वाढ आणि शेतकऱ्यांना मोठा दिलासा

छत्रपती संभाजीनगर दि.४ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर शहर आणि ग्रामीण भागात गेल्या दोन दिवसांपासून पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. आज शहर व परिसरात सकाळपासून पाऊस बघायला मिळाला. शहरात दिवसभर आधुनमधुन रिमझिम पाऊस झाला. जिल्हयात काही ठिकाणी मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे. पैठण, वैजापूर आणि गंगापूर या भागांमध्ये मध्यम स्वरूपाचा पाऊस पडत आहे. सतत पडत असलेल्या पावसाने नद्यांच्या पाणीपातळीत वाढ झाली आहे. या पावसामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाल्याचे चित्र दिसत आहे.

तब्बल एक महिना उशिरा पावसाने हजेरी लावल्यामुळे आता शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. या रिमझिम पावसामुळे शेतातील पेरण्यांना आणि लागवडीच्या कामांना वेग आला असून शेतकरी आता सज्ज झाले आहेत. मात्र, अद्यापही शेतकऱ्यांना एका मोठ्या पावसाची प्रतीक्षा आहे.

शहरामध्ये रोज पडत असलेल्या पावसामुळे नागरिकांची उष्णतेपासून सुटका झाली असून हवेत गारवा निर्माण झाला आहे. पावसाचा जोर पाहता हवामान विभागाकडून ऑरेंज आणि येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तसेच, प्रशासनाच्या वतीने नदी आणि नाल्यांच्या शेजारी असणाऱ्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.



# जालना-बीड महामार्गावर दोन एसटी बसची समोरासमोर धडक; विद्यार्थी व प्रवासी जखमी



जालना दि.४ (प्रतिनिधी)- बीड महामार्गावरील अंबडजवळील शहापूर येथील गलाट नदीच्या पुलावर शनिवारी (दि. ४) सकाळी सुमारे १० वाजण्याच्या सुमारास दोन एसटी बसची समोरासमोर जोरदार धडक होऊन भीषण अपघात झाला. या अपघातात सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसली, तरी दोन्ही बसमधील अनेक विद्यार्थी व प्रवासी जखमी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, अंबड आगाराची प्रवासी बस भांबेरे येथून विद्यार्थ्यांसह अंबडकडे येत होती. त्याचवेळी अंबडहून बीडकडे जाणारी दुसरी एसटी बस गलाट नदीच्या पुलावर समोरून आली. पुलावरच दोन्ही बसची समोरासमोर जोरदार धडक झाली. धडकेचा आवाज परिसरात घुमताच जवळील शेतात काम करणाऱ्या शेतकऱ्यांनी आणि नागरिकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. स्थानिकांनी तत्परता दाखवत जखमी प्रवासी व विद्यार्थ्यांना बसमधून बाहेर काढून रुग्णवाहिका आणि अन्य वाहनांच्या मदतीने अंबड येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. काही गंभीर जखमींना पुढील उपचारासाठी जालना येथील शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले.

जालना येथे उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्या जखमींमध्ये बस चालक सारंगकर, काकासाहेब ठोके, शिवकन्या चंद्रकांत गाडगे (रा. धाकलगाव), निलेश चंद्रकांत देशमुख आणि शेख चांद शेख हाफीस यांचा समावेश असल्याची माहिती मिळाली आहे. अन्य काही प्रवाशांवर अंबड येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अपघाताची माहिती मिळताच पोलीस आणि संबंधित यंत्रणा घटनास्थळी दाखल झाली. अपघातामुळे काही काळ जालना-बीड महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. पोलिसांनी वाहतूक सुरळीत करत अपघाताचे कारण शोधण्यास सुरुवात केली आहे. या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नसल्याने मोठी दुर्घटना टळली असली, तरी अनेक विद्यार्थी व प्रवासी जखमी झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरीक्षण; जिल्हाधिकाऱ्यांनी केली प्रत्यक्ष पाहणी, मतदारांच्याही घेतल्या भेटी



छत्रपती संभाजीनगर दि.४ (प्रतिनिधी)- जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी आज शहरातील काही भागात भेटी देऊन मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण कामकाजाची पाहणी केली.

चिकलठाणा, शेंद्रा, नक्षत्रवाडी इ.भागात मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांच्या गृहभेटींची प्रत्यक्ष पाहणी केली. उपविभागीयअधिकारी डॉ. व्यंकट राठोड, तहसीलदार बिडवे तसेच स्थानिक कर्मचारी, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी गौडा यांनी यावेळी मतदारांशी सुद्धा संवाद साधला. सध्या मतदार याद्यांच्या पुनरीक्षणाचे काम सुरु असून दि. २९ पर्यंत मतदान केंद्र स्तरीय अधिकारी घरोघरी जाऊन याद्यांची पडताळणी करणार आहेत. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार हा उपक्रम राबविला जात आहे.

# हर्सूल मुख्य कारागृह परिसरात स्वच्छता अभियान व वृक्षारोपण १३० रोपांची लागवड

छत्रपती संभाजीनगर दि.४ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने आज, दि. ४ जुलै रोजी हर्सूल मुख्य कारागृहासमोरील मैदान परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानानंतर परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

यावेळी नगरसेवक राज गौरव वानखेडे, राहुल रोजतकर, उल्हास पाटील तसेच माजी नगरसेविका स्वाती नागरे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी एकूण १३० रोपांची लागवड करण्यात आली.

या प्रसंगी उपआयुक्त तथा घनकचरा व्यवस्थापन विभागप्रमुख नंदकिशोर भोंबे, मुख्य उद्यान अधिकारी डॉ. विजय पाटील, उद्यान विभागाचे निरीक्षक नानासाहेब पठाडे तसेच महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमात परिसराची स्वच्छता करण्यात आली तसेच वृक्षारोपणाद्वारे हरित शहराच्या संकल्पनेला बळकटी देण्याचा प्रयत्न करण्यात आला.



## (मागील अंकावरून)

### देशभरात पावसाचे धुमशान!;...

झालेल्या मुसळधार पावसामुळे जलाशयाची पातळी वाढल्याने खबरदारीचा उपाय म्हणून इडुक्की जिल्ह्यातील पंबला धरणाचे दरवाजे उघडण्यात आले. पेरियार नदीच्या दोन्ही काठावर राहणाऱ्या लोकांना सतर्क राहण्याचा सल्ला देण्यात आला.

अरुणाचल प्रदेशात मुसळधार पावसामुळे आलेल्या अचानक पुरामुळे आणि दरडी कोसळल्यामुळे अरुणाचल प्रदेशातील अनेक दुर्गम गावांचा राज्याच्या इतर भागांशी संपर्क तुटला होता. परिणामी, पूरग्रस्त भागांत अन्न आणि औषधे पोहोचवण्यासाठी प्रशासनाला एका व्यावसायिक हेलिकॉप्टरची मदत घ्यावी लागली.

लोअर सियांग जिल्ह्यातील रोटे, रामे, लोग्लू, लिपिन, माने, टेने, सिपू, काक्की, काडू, रिना, सिडो आणि कोरंग यांसारखी गावे पूल कोसळल्यामुळे आणि दरडींमुळे रस्ते बंद झाल्यामुळे पूर्णपणे अलग पडली होती. लोअर सियांगच्या उपायुक्तांच्या तातडीच्या विनंतीवरून, अधिकाऱ्यांनी या मोहिमेसाठी स्कायवन एअरवेजद्वारे चालवले जाणारे एमआय-१७२ हेलिकॉप्टर तैनात केले.

### राज्यभरात सर्वदूर पाऊस पुढील दोन...

मुंब्रा परिसरात मोठ्या प्रमाणावर पाऊस झाला. त्यामुळे अनेक भागात पावसाचं पाणी साचल्याचं पहायला मिळालं. मुंब्रा अमृतनगर परिसरात काही दुकानंही पाण्याखाली गेली. गेल्या सहा तासात मुंब्रात ८८.८४ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे.

पालघर शहरासह परिसरात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. पालघरसातपाटी रोडवरील टेंभोडे परिसरात मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने रस्ता जलमय झाला आहे. रस्त्यावरून पुराचे पाणी वाहत असल्याने वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत असून वाहतुकीवर परिणाम झाला आहे. अनेक वाहनांची गती मंदावली असून नागरिकांनी अत्यावश्यक कामाशिवाय या मार्गावर प्रवास टाळावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

पालघर तालुक्यात काल सायंकाळपासून मुसळधार पावसाने जोर धरला असून कालच्या दिवसभरात ९८ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. मात्र पालघर शहरात तब्बल ३०५ मिलिमीटर पावसाची नोंद झाली असून तालुक्यातील जनजीवन विस्कळीत झाले. जिल्ह्यात पावसाने सरासरी गाठली असून सद्यस्थितीत या हंगामात १२२ टक्के पाऊस नोंदवण्यात आला आहे. रायगड जिल्ह्यात पावसाचा जोर वाढला असून पाली, नागोठणे परिसरात जोरदार पाऊस झाल्याने अंबा नदीने धोका पातळी ओलांडली आहे. अंबा नदीवरील भेरव-खुरावले फाटा येथील छोट्या पुलावरून पाणी वाहू लागलं आहे. तर पुलापलीकडील महागाव, वाघोशी, भेरव, ताडगाव या गावांचा पालीशी संपर्क तुटला आहे. रत्नागिरी जिल्ह्यात पावसाचा जोर वाढत असल्याने प्रशासनाने खबरदारीच्या उपाय योजनांना वेग दिला आहे. आज चिपळूण शहरातील संभाव्य पूर येणाऱ्या ठिकाणांची पाहणी करण्यात आली. यासाठी एनडीआरएफचे पथक चिपळूणमध्ये दाखल झाले असून, प्रांताधिकारी आणि तहसीलदार प्रवीण लोकरे यांच्यासमवेत वाशिष्ठी व शिवनदी परिसरातील पूरबाधित होण्याची शक्यता असलेल्या भागांची रेकी करण्यात आली. संभाव्य धोक्याच्या ठिकाणांचा आढावा घेत प्रशासनाने आवश्यक तयारीची पडताळणी केली. यावेळी प्रशासनाकडून एनडीआरएफच्या पथकाला आवश्यक सूचना देत कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीला तातडीने प्रतिसाद देण्यासाठी सज्ज राहण्याचे निर्देश दिले.चिपळूण मधील विविध ठिकाणी भेट देत च्या टीम कडून पाहणी करण्यात आली. राज्यातील धरणांमधील पाणीसाठ्यात वाढ होत असली तरी अद्याप समाधानकारक स्थिती निर्माण झालेली नाही. राज्यातील ३ हजार २८ मोठे, मध्यम आणि लघु प्रकल्पांमध्ये एकूण १० हजार ४४३ दशलक्ष घनमीटर इतका उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध आहे. तो एकूण क्षमतेच्या २५.५६ टक्के आहे.

# गुड न्यूज! आता महाराष्ट्र शासनाचे थेट अपडेट्स मिळणार, व्हॉट्सअॅप चॅनल आणि पब्लिक अॅप वर!

मुंबई दि.४ (प्रतिनिधी)- समाजमाध्यमांच्या विविध प्लॅटफॉर्म्सद्वारे नागरिकांपर्यंत अचूक, अधिकृत आणि वस्तुनिष्ठ माहिती पोहोचविणाऱ्या महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने आता व्हॉट्सअॅप चॅनल आणि पब्लिक अॅप वर अधिकृत, प्रमाणित खाती सुरू केली आहेत.

आता नागरिक व्हॉट्सअॅप चॅनलवर , या नावाने, तर पब्लिक अॅपवर महाराष्ट्र शासन या नावाने शासकीय घडामोडींचे थेट अपडेट्स मिळवू शकतील. या दोन्ही प्लॅटफॉर्म्समुळे जनतेपर्यंत अधिक गतीने, अचूक, अधिकृत आणि वस्तुनिष्ठ माहिती थेट आणि व्यापक स्वरूपात पोहोचण्यास मोठी मदत होणार आहे.शासन आणि जनतेला जोडणारा महत्त्वाचा दुवा आणि महाराष्ट्र शासनाच्या प्रसिद्धीच्या कामाचे संपूर्ण समन्वयन करणारी यंत्रणा म्हणून माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाची ओळख आहे. शासनाचे विविध लोकोपयोगी उपक्रम, योजना जनतेपर्यंत पोहोचविणे आणि त्याबाबतच्या जनतेच्या प्रतिक्रिया शासनापर्यंत पोहचविण्याची दुहेरी जबाबदारी महासंचालनालय पार पाडत असते. हे काम करताना डिजिटल क्रांतीचा पुढचा टप्पा म्हणून महासंचालनालयाने हायपरलोकल कंटेंट देणाऱ्या पब्लिक अॅप वर आणि व्हॉट्सअॅप चॅनल वर आपली उपस्थिती नोंदवली आहे.

महाराष्ट्र शासनाचे अधिकृत अपडेट्स हवे आहेत? मग खालील लिंक्सवर क्लिक करून आजच जॉईन व्हा

व्हॉट्सअॅप चॅनल : https://whatsapp.com/channel/0029VbBTiPx5Ui2ZR3iQwV3I

पब्लिक अॅप : https://public.app/user/profile/aaSpb26TIpVKSSUIGc7wkCxA1to1

महासंवाद : https://mahasamvad.in/

एक्स (ट्विटर) : https://twitter.com/MahaDGIPR

फेसबुक : https://www.facebook.com/MahaDGIPR

इन्स्टाग्राम : https://www.instagram.com/mahadgipr

युट्यूब : https://www.youtube.com/MAHARASHTRADGIPR

टेलिग्राम : https://t.me/MahaDGIPR

डेलिहंट : https://profile.dailyhunt.in/mahasamvad

अफवांवर विश्वास ठेवू नका! शासनाच्या अधिकृत आणि खात्रीशीर माहितीसाठी वरील चॅनेल्सना नक्की फॉलो करा.

# पावसामुळे झाड कोसळून नागरिक जखमी




पुणे दि.४ (प्रतिनिधी)- गेल्या चार दिवसांपासून सुरु असलेल्या पावसामुळे पिंपळे सौदागर परिसरातील कुणाल आयकॉन रोडवरील हॉटेल सौदागर समोरील झाड कोसळून एक नागरिक गंभीर जखमी झाल्याची घटना शनिवारी सकाळी घडली. एस. एन. गुंडाळे हे त्या जखमीचे नाव असून त्याला तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कुणाल आयकॉन रोड परिसरात सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे अचानक मोठे झाड कोसळले. यामध्ये श्री. एस. एन. गुडाळे हे गंभीर जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच पिंपरी-चिंचवड महापालिकेतील विरोधी पक्षनेते तथा नगरसेवक विठ्ठल उर्फ नाना काटे यांनी तात्काळ संबंधित अधिकाऱ्यांना मदत कार्य सुरू करण्याच्या सूचना देऊन रुग्णवाहिका घटनास्थळी रवाना केली. दरम्यान पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या उद्यान विभागातील सहाय्यक अधीक्षक अनिल गायकवाड आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी जाऊन झाडाच्या रस्त्यावर पडलेल्या फांद्या कापून रस्ता वाहतुकीसाठी मोकळा केला. जखमी नागरिक गुडाळे यांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात येऊन त्यांना तातडीने पिंपळे सौदागर येथील जीवन ज्योती रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. या दुर्घटनेत त्यांच्या मणक्याला गंभीर दुखापत झाल्याची माहिती नाना काटे यांनी दिली.

# शहराचा समृद्ध इतिहास उलगडणारा 'धावणी मोहल्ला हेरिटेज वॉक' आज

## गांधी पुतळा ते अप्पा हलवाईपर्यंत ऐतिहासिक वारशाची अनोखी सफर

छत्रपती संभाजीनगर दि.४ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगरच्या समृद्ध ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि वास्तुशिल्प वारशाचा परिचय नागरिकांना व्हावा, तसेच जुन्या शहराचा इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचावा या उद्देशाने महापौर समीर राजुरकर यांच्या संकल्पनेतून व आयुक्त अमोल येडगे यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आणि इंटॅक, छत्रपती संभाजीनगर चॅप्टर यांच्या संयुक्त विद्यमाने 'धावणी मोहल्ला हेरिटेज वॉक' चे आयोजन करण्यात आले आहे.

हा हेरिटेज वॉक रविवार, दि. ५ जुलै २०२६ रोजी सकाळी ७.०० ते ९.०० या वेळेत आयोजित करण्यात आला असून, शहागंज येथील गांधी पुतळा येथून प्रारंभ होऊन पानदरिबा येथील अप्पा हलवाई येथे समारोप होणार आहे.

या हेरिटेज वॉकमध्ये सहभागी नागरिकांना शहागंज, सराफा, धावणी मोहल्ला आणि पानदरिबा परिसरातील ऐतिहासिक वास्तू, प्राचीन मंदिरे, उदासी आखाडा, भाई दयासिंहजी गुरुद्वारा तसेच शहराच्या सांस्कृतिक वारशाशी निगडित अनेक ऐतिहासिक स्थळांचा अभ्यासपूर्ण परिचय करून देण्यात येणार आहे. या परिसरातील वास्तुकला, परंपरा आणि इतिहासाची माहिती तज्ज्ञांकडून प्रत्यक्ष स्थळांवर देण्यात येईल.

यंदाचा हेरिटेज वॉक शहागंज येथील गांधी पुतळ्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त तसेच शीख पंथाचे भाई दयासिंहजी यांच्या ३६९ व्या जयंती वर्षानिमित्त विशेष स्वरूपात आयोजित करण्यात आला आहे. शहराचा ऐतिहासिक वारसा जतन करण्यासाठी आणि नागरिकांमध्ये इतिहासाबद्दल जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात इतिहासप्रेमी, विद्यार्थी, संशोधक तसेच सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे,असे आवाहन उप आयुक्त तथा विभाग प्रमुख अंकुश पांढरे,सहायक आयुक्त ऋतुजा पाटील यांच्या वतीने करण्यात आले आहे.

या कार्यक्रमासाठी संपर्क: ९७६५७५४३८० / ९४२०७५९४५५.

# ०६ जुलै रोजी महानगरपालिका लोकशाही दिन

छत्रपती संभाजीनगर दि.४ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने महानगरपालिका स्तरावरील लोकशाही दिन प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी राबविण्यात येतो.

माहे जुलै २०२६ चा महानगरपालिका लोकशाही दिन सोमवार दि.०६ जुलै २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता प्रशासकीय समिती कक्ष ,मनपा मुख्यालय येथे आयुक्त यांचे अध्यक्षते खाली आयोजीत करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडून दिलेल्या सुधारित परिपत्रकानुसार लोकशाही दिनाच्या १५ दिवस अगोदर विहित नमुन्यात आवश्यक कागद पत्रासह अर्ज दिलेल्या नागरिकांनाच दि.०६ जुलै २०२६ रोजी समक्ष अर्ज सादर करण्याची परवानगी राहील ,याची नोंद घ्यावी.

ज्यांनी या पूर्वीच्या महानगरपालिका लोकशाही दिनात तक्रार अर्ज दिलेले असतील परंतु त्याच प्रकरणात अद्याप कार्यवाही झाली नाही अशा प्रकरणात त्यांनी पुन्हा अर्ज देण्याची आवश्यकता नाही असे अतिरिक्त आयुक्त ०२ कल्पिता पिंपळे छत्रपती संभाजीनगर पालिका यांनी कळविले आहे.

## शुद्धीपत्रक

**छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका पथविक्रेता समिती सदस्य निवडणूक कार्यक्रम -२०२६**

**निवडणूक कार्यक्रमाबाबत शुद्धीपत्रक**

पथविक्रेता (उपजीविकेचे सरंक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम २०१४ व महाराष्ट्र पथविक्रेता (उपजीविकेचे सरंक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम २०१६ मधील नियम १४ (२) अंतर्गत ०८ प्रवर्गातील पथविक्रेत्यांच्या समिती सदस्यासाठी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका अंतर्गत पथविक्रेता निवडणुक प्रक्रिया राबविण्यात येत आहे. त्यानुसार यापूर्वी पथविक्रेता निवडणुक कार्यक्रमाचे जाहीर प्रगटन वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आलेले असून सदरील कार्यक्रमामध्ये तांत्रिक कारणास्तव नामनिर्देशन पत्र मागे घेण्याची दिनांक व १ मतदान केंद्रात खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

**नामनिर्देशन पत्र माघारी नंतरची अंतिम यादी प्रसिद्ध करणे बाबत बदल :-**

| अ. क्र. | विवरण | या पूर्वीची दिनांक | सुधारित दिनांक | वेळ | स्थळ |
|---|---|---|---|---|---|
| ७ | नामनिर्देशन पत्र मागे घेणे | १७/०७/२०२६ शुक्रवार | १४/०७/२०२६ मंगळवार ते १७/०७/२०२६ शुक्रवार | सकाळी ११.०० ते सायं. ४.०० पर्यंत | प्रकल्प विभाग, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका |

**मतदान केंद्रात करण्यात आलेला बदल :-**

| अ.क्र | विवरण | दिनांक | वेळ | या पूर्वीचे मतदान केंद्र | सुधारित मतदान केंद्र |
|---|---|---|---|---|---|
| ९ | मतदान | २५/०७/२०२६ | सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.०० पर्यंत | मनपा शाळा, सिल्कमिल कॉलोनी (प्रभाग क्र. ९ व १० मधील पथविक्रेत्यांसाठी) | मनपा प्राथमिक शाळा, एकनाथ नगर (प्रभाग क्र. ९ व १० मधील पथविक्रेत्यांसाठी) |

वरील प्रमाणे शुद्धीपत्रक देण्यात येत आहे.

स्वाक्षरी
(अमोल येडगे) भा.प्र.से.
आयुक्त,
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका